॥ श्री ॥

# स्वराज्याचा भक्कम पाया

व त्यावरील

# भव्य अष्टपैलु मंदिर.

## याचा सुरेख चित्रपट.



राखावया सुस्थित लोक आपुला

चिहि फार तापला,

ण्यास दूर-

तेचि शूर ॥ १॥

लेखक

रा. ब. गोडबोले.

भट, यशवंत प्रेस, पुणे

ोले, २३० शनवार, पुणें.

1449

864.1
God
6190

D.V.POTDAR
S P COLLEGE
D01449

॥ श्री ॥

# स्वराज्याचा भक्कम पाया

व त्यावरील

# भव्य अष्टपैलु मंदिर.

## याचा सुरेख चित्रपट.



राखावया सुस्थित लोक आपुला
स्वदेश तैसाचिहि फार तापला,
नाना प्रकारीं करण्यास दूर-
तत्ताप, जे भागति तेचि शूर ॥ १ ॥

---

रेखक

रा. ब. गोडबोले.

---

किंमत ८ आणे.

स्वराज्यवादी, स्वत्यागी,

आणि

सत्याग्रही

अतएव

कारागृहवासी

अशा माझ्या

पंचवीस हजार देशबांधवांस

त्यांच्या सन्मानार्थ

हें पुस्तक

अर्पण केलें आहे.

रा. ब. गोडबोले.

## वाचकांशीं हितगुज.

कृषिप्रधान अशा या हिंदुस्थानदेशांत **गोधनाची** व **ब्राह्मणांच्या विद्याधनाची** महती लक्षांत आणून **श्रीशिवाजीमहाराजांनीं** महाराष्ट्रांत **स्वराज्याची** स्थापना केली. त्याच तत्वाचें अनुसंधान ठेवून सद्य:स्थितीस अनुरूप अशा **नवीन स्वराज्याचें** ध्येय राष्ट्रांतील **महात्म्या लोकमान्यांनीं** जनतेपुढें **मांडलें** आहे. त्याची तरुणपिढीस ओळख करून यावी या हेतूनें हें लहानसें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें धाडस मी करीत आहें. तरी **आबालवृद्ध स्त्रीपुरुष** तरुण वाचकांनीं यांतील तत्वें आपलींशीं करून जिवाभावानें त्यांचें आचरण करूं लागावें अशी **सिद्धिदात्या** श्रीमंगलमूर्ति **गजाननाचे** चरणीं मी प्रार्थना करितों. तिला सर्वांनीं **तथास्तु** ह्मणावें.

यशवंतविद्याभक्ताश्रम,
तांब्यांचा वाडा,
शनवार पेठ, पुणें.
गणेशचतुर्थी, शके १८४४.

**रा. ब. गोडबोले.**
माजी हेडमास्तर
श्री. श्री. हायस्कूल,
संस्थान औंध.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| १ विषयप्रवेश ... ... ... ... | १–४ |
| २ कामदारी ... ... ... ... | ४–९ |
| ३ ऐपतदारी ... ... ... ... | ९–१७ |
| ४ शिलेदारी ( परिशिष्ट ) ... ... | ३८–३९ |
| ५ राजसत्ता कीं लोकसत्ता ? ... ... | १८–२० |
| ६ अष्टमूर्ति कीं त्रिमूर्ति ? ... ... ... | २०–२४ |
| ७ चातुर्वर्ण्य कीं एकवर्ण्य ? ... ... ... | २४–२९ |
| ८ त्रिवर्ग, चतुर्वर्ग कीं एकवर्ग ? ... ... | २९–३७ |
| ९ परिशिष्ट दुसरें ... ... ... | ४० |

॥ श्रीगजानन ॥

मार्गशीर्ष शु ॥ २ गुरुवार, शके १८४३, ता. १।१२।१९२१

चरितं देवदेवस्य महादेवस्य पावनम् ।
अपारं परमोदारं चतुर्वर्गस्य साधनम् ॥ १ ॥

यमनियम करोनी विप्रवर्णी करावें ।
झिजवुनि निजकाया क्षत्रियांहीं वरावें ।
निजधन वितरूनी वैश्यवर्गें पहावें ।
परहितिं खपणाऱ्या शूद्र वर्गास भावें ॥ २ ॥

मुखं वागीश्वरः पातु बाहू भूभारनाशकः ।
ऊरू महेश्वरः पातु चरणौ करुणार्णवः ॥ ३ ॥

दुंदुभिस्तु सुतरामचेतनस्तन्मुखादपि धनं धनं धनम् ॥ ४

धनान्यर्जयध्वं धनान्यर्जयध्वम् ॥ ५ ॥

कार्य कर्म करण्यास सजावें ।
संग सोडुनि फलीं, निजभावें ॥
रे नरा, तरिच सर्व आपदा ।
टाळुनी परम पावसी पदा ॥ ६ ॥

एकनेकां साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ॥—तुकाराम.

## रान्तत्रयी.

**कामदार** Labourers हातानें व डोक्यानें काम करणारे. मजुरापासून प्रधानापर्यंत सर्व.

**जमीनदार** ( ऐपतदार ) Landholders शेतकऱ्यापासून संस्थानिकापर्यंत सर्व.

**शिलदार** ( शिलेदार ) Soldiers पायदळ, घोडेस्वार, गोलंदाज वगैरे भूचर; खलाशी, मालिम वगैरे सर्व जलचर; आकाशीं विमानवाहकांपासून खचर; अधिकारी सर्व सैनिक.

# १ विषयप्रवेश

—:०:—

धर्मार्थकाममोक्षाणां यस्यैकोऽपि न विद्यते ॥
अजागलस्तनस्येव तस्य जन्म निरर्थकम् ॥ १ ॥

१ राष्ट्र-सूत्रधार लो. मा. श्री. जी. बळवंतरावजी टिळक यांनीं गेल्या चाळीस वर्षांत अविश्रान्त श्रम करून या " सुवर्णभूमीला " स्वत्वाची ओळख करून देऊन स्वराज्याचें श्रेष्ठ ध्येय तिच्यापुढे मांडलें. आणि त्यांचे निधनानंतर तें ध्येय साधण्याचीं साधनें म्हणून महात्मा गांधींनीं " चौथा अंतोरीस " हातीं धरण्याविषयीं सर्व देशबंधूंस विनंती केली. त्या विनंतीस मान देण्याचें नाकारून, चतुर्विध पुरुषार्थाचें साधन न करितां, आपण " अजागळांच्या, गळथानांच्या " वर्गांत सामिल होणार काय ? बोला, मित्रहो ! लवकर बोला !

या प्रश्नाच्या उत्तरावर तुमचें भवितव्य अवलंबून आहे !

२ सर्व सुधारलेल्या जगाचें ' गुरुस्थान् ' पटकावण्याचें जर तुमच्या मनांत असेल, तर तुम्हीं सत्ता व मालमत्ता संपादनार्थ रात्रंदिवस झटलें पाहिजे. ईश्वरानें जन्मतःच सर्वांस सत्ता दिली आहे. त्या सत्तेचें तनमनधनानें सुरक्षण करून " मालमत्ता " मिळविण्याचा खटाटोप करणें हें सुधारणेचें लक्षण आहे, असें एके ठिकाणीं म्हटलें आहे. हें सुधारणालक्षण आपल्या आंगीं बाणलें आहे असें दाखवूं इच्छिणाऱ्या प्रत्येक माणसानें पुढील कोणच्या तरी एका रींत आपला समावेश करून घेतला पाहिजे. नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्या प्रत्येक रींत समाविष्ट होण्याची वेळप्रसंगानें सर्वांची तयारी असली पाहिजे.—**१ कामदारी, २ पेपतदारी** आणि **३ शिलेदारी**- या त्या तीन री होत.

नित्याच्या भाकरीसाठीं प्रत्येकानें कामदारी पतकरली पाहिजे, ह्मणजे मजूर बनून कांहीं तरी द्रव्योत्पादनाचा धंदा केला पाहिजे. मग नेहमींचा आपला उदरनिर्वाह करून द्रव्य संग्रहीं टाकून **ऐपतदारी** ह्मणजे मालमत्तादारी, जमीनदारी मिळविली पाहिजे. आणि या दोन्ही **री** आपल्या कुळांत निरंतर नांदण्याकरितां व स्वदेशाचें परकीय शत्रूंपासून रक्षण करण्याकरितां तिसऱ्या **री** चें ह्मणजे **शिलेदारीचें** अथवा **शिपाईगिरीचें** शिक्षण विद्यार्थिदशेंत असतांच प्राप्त करून घेतलें पाहिजे.

३ देशांतील प्रत्येक इसमास या तिन्ही **रींतून** कोणतींत तरी सुप्रतिष्ठित होऊन राहण्याचें शिक्षण देणें हें सर्व **स्वराज्यनिष्ठांचें** मंगलकर्तव्य आहे. तें बजावण्यास स्वराज्यांतील तिजोरीचा मोठा भाग खर्चण्यास आपण एका पायावर उभें असलें पाहिजे, आणि मुलांचें व मुलींचें सर्व प्राथमिक शिक्षण **मोफत व सक्तीचें** केलें पाहिजे. प्राथमिक शिक्षणांत लेखन, वाचन, मापन या ले. (writing) वा. (reading) मा. (arithmetic) चा मी अंतर्भाव करितों. मुलांस व मुलींस **ले.वा.मा.** च्या शिक्षणाबरोबरच भाकरी मिळविण्याचा धंदा ह्मणून गांधीजीच्या चौघा 'अंतरीं' मधून एका **रीचें** शिक्षण अवश्य मिळालें पाहिजे. ज्याचे अंतीं **री** हें अक्षर आहे तो अंतरी. या चौघा अंतरींचें परिगणन खालील पद्यांत केलें आहे—

> **सटारी, वॅटारी** मज करिं धरायास सजतो,
> दुजा तो **पिंजारी** उदरभरणालागिं भजतो;
> **सुतारी, कांतारी** मग करिं धरी तो **विणकरी,**
> तया **कोष्टी, साळी** ह्मणति; कथिली गोष्ट हि खरी ॥१॥

हे चौघेही **अंतरी** हातानें काम करणारे मजूर आहेत. मी (मज) ह्मणजे कापूस. तो आपल्या चौघां उपकारकर्त्यांची नांवें सांगत

आहे. जन्मदात्यानंतर माझ्यावर उपकार करणाऱ्यांपैकीं मला पहिल्यानें हाताशीं धरणारा वठारी उर्फ वेंटारी. हा माझ्यांतील सरकी काढून टाकून, ह्मणजे मला वटून माझें वेंट किंवा वेंटाळीं बनवितो. मग आपलें पोट भरण्यासाठीं मला **पिंजारी** हातीं धरतो. त्यानंतर मी **सुतारी** किंवा **कांतारी** ह्मणजे सूत काढणारा किंवा कांतणारा यांचे हातीं पडतों. आणि शेवटीं मला **विणकरी** ह्मणजे कोष्टी किंवा साळी चांगल्या नांवारूपास आणितो. कृतज्ञश्रेष्ठ कापूस आणखी सांगतो कीं—

ज्यांच्या अंतीं **री**, असे हेच चार,
माझा लोकीं वाढवीती प्रचार;
सौंदर्यातें ओपिती सत्तनूला.
यांची ये ना अन्य कोणास तूला. ॥ १ ॥

तरी आणखी एका **रीला** मीं विसरतां कामा नये. तो कोण ह्मणाल, तर माझा जन्मदाता **शेतकरी. कामदारी, पेपतदारी** किंवा **शिपाईगिरी** यांतून कोणत्याही रींत तुह्मी समाविष्ट झालां असलां तरी जन्मदात्या **मायभूमीचे** तुह्मी **ऋणकरी** आहां, ही गोष्ट निरंतर आपल्या डोळ्यांपुढें ठेवा आणि तिच्या **उद्धाराचा** अव्याहत प्रयत्न चालू ठेवा. त्याच वेळीं ध्यानांत धरा कीं—

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्

म्हणून

स्वदेशहितअष्टका पढुनियां प्रभातीं, जनें
**स्वराज्य** मिळवावया करुनि यत्न मोठ्या मनें,
निरंतरचि राखण्या स्वकारें तें, करावीं तनें
प्रयास करुनी दृढें, सकळ वेंचुनीही धनें ॥ १ ॥

४ **मायभूमीचे** ऋणांतून मुक्त होण्यास **तुम्हांपैकीं** प्रत्येकानें

प्रथमतः पहिल्या रींत शिरून तेथें सुप्रतिष्ठित होऊन पुढच्या रींत पाऊल टाकण्याच्या तयारीस लागलें पाहिजे. यासाठीं तुम्ही आपणांस एका रीचा दृढाभ्यास करून काटक व काटकसरी बनलें पाहिजे. काटक व काटकसरी झाल्याशिवाय पुढच्या कोणत्याही रींत प्रवेश करण्याची लायकी तुम्हांस यायची नाहीं. कामदारीच्या पुढची ऐपतदारी. ही स्वराज्याचा पाया किंवा आधार आहे असें म्हणणें वावगें होणार नाहीं. कारण कीं, स्वराज्याचे घटक किंवा भागीदार जे कामदार त्यांपैकीं प्रत्येकास स्वराज्यांत आपला योग्य हिस्सा घेण्यास त्याजपाशीं ऐपतदारी असणें अत्यंत अवश्य आहे. तीवांचून त्याला स्वराज्याची गोडी अथवा मातबरीच कळणार नाहीं. व त्याला ती कळली नाहीं तर तिच्या संरक्षणार्थ जरूर लागणारी जी तिच्या पुढची शिलेदारी, तींत त्याला काय मौज वाटणार आहे? एवंच स्वराज्य मिळविण्यास व तें आपल्या हातीं राखण्यास अवश्य लागणाऱ्या ज्या री वरती सांगितल्या त्यांचें धारण व पोषण स्वराज्यांतील प्रत्येक मनुष्यामध्यें होऊन त्यानें त्या त्या रींतील केवळ एक कामदार, ऐपतदार, किंवा शिलेदारच न राहतां तींतला 'सरदार' होण्याची पात्रता आपल्या अंगीं कशी आणावी याचें विवेचन पुढील एकेका प्रकरणांत क्रमानें करण्याचें योजिलें आहे.

---

## २ कामदारी.

केल्यानें देशाटन, पंडितमैत्री, सभेंत संचार,
शास्त्रग्रंथविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार. ॥

५ स्वराज्यास आधारभूत ३ रींपैकीं पहिली कामदारी, ही प्रत्येकास जन्मतःच देवानें दिलेली असते. तिला जरूर तितकें प्राथ-

मिक शिक्षण प्रत्येक नागरिकास म्हणजे शहरांत जन्मलेल्या मनुष्यास व जानपदास म्हणजे खेड्यापाड्यांत उपजलेल्या मुलांस मोफत व सक्तीनें देणें हें लोकसत्ताक स्वराज्याचें ब्रीद असलें पाहिजे. पण तितक्या शिक्षणानें तृप्त राहणें हें नागरिकास किंवा जानपदास क्वचित आवडणार नाहीं. सहज प्राप्त झालेल्या स्थितींतून स्वतःच्या प्रयत्नानें व बुद्धिबलानें वर डोकें काढून वरच्या पायरीवर जाऊन बसण्याची हांव व धमक बाळगणें हें कोणासही भूषणदायकच होय. म्हणून हा प्रयत्न प्रत्येक इसमानें करावा.

६ असा प्रयत्न करून प्रत्येक कामदारानें आपापल्या वर्गांतील सरदार बनावें ही गोष्ट कोणत्याही समाजास हितकारकच होय. या गोष्टीच्या बुडाशीं एक तत्व आहे, तें असें कीं, प्रत्येक कामदारास त्याच्या कामाचा योग्य मोबदला पैशाच्या रूपानें मिळाला पाहिजे. मग तो पैसा त्यानें पाहिजे तर आजच्या आज खर्चून टाकावा, किंवा उद्यां खर्चावा; किंवा संग्रहीं टाकून, त्याचे साह्यानें आपली सांपत्तिक व सामाजिक स्थिति सुधारावी. यांपैकीं इच्छेस येईल त्याप्रमाणें वागण्याची प्रत्येक कामदारास मुभा असली पाहिजे. म्हणजे तो ज्या मानानें सुशिक्षित, बुद्धिमान, निरोगी मनाचा, आणि धाडसी किंवा शूर असेल, त्या मानानें आपल्या वर्गाचा व परंपरया राष्ट्राचा उत्कारकर्ताच होईल. आणि असें होणें हा त्याचा ईश्वरदत्त हक्क आहे. हा हक्क बजावण्यास कोणताही शहाणा कामदार चुकणार नाहीं, अशी आशा आहे. हा हक्क बजावण्यास कामदाराचे आंगीं चातुर्य पाहिजे. तें चातुर्य संपादन करण्याचे चार मार्ग या प्रकरणाचे आरंभीं घातलेल्या आर्येंत दाखल केलेले आहेत. त्यांतले पुढले तीन हे कामदारास आपलें रोजचें निर्वाहाचें काम संभाळून फुरसतीच्या वेळीं आचरतां येण्याजोगे आहेत. त्यांची थोडीशी दिशा एथें त्यास

दाखवावयाची आहे.

७ यांत ' पंडितमैत्री ' ह्मणजे विद्वानांचा सहवास किंवा संगति. प्राचीनकाळीं हें साधन जानपदास ह्मणजे खेड्यांत राहून आपलें शेतभात संभाळून व मोलमजुरी करून निर्वाह करणारांस बरेंच दुर्लभ होतें. पण आजकाल आगगाड्या, मोटारी व सायकल्स यांचे साह्यानें आणि एकंदर लोकांत व त्यांबरोबर विद्वानांत प्रवासाची हौस वाढल्यानें हें साधन खेडयांतील अज्ञ जनांसही सुलभ झालें आहे. शहरांतील कोणी सुशिक्षित विद्वान गृहस्थ, हरिदास, पुराणिक, शिक्षक, हवा पालटण्याकरिता, खासगी कामाकरितां, कांहीं व्यापारधंद्याची माहिती मिळविण्यास्तव, किंवा सार्वजनिक हिताची एकादी चळवळ करण्यासाठीं आपल्या गांवीं आले असतां त्यांची खासगी रितीनें भेट घेऊन, त्यांकडून एकादें व्याख्यान, कीर्तन किंवा प्रवचन करविण्याची संधी गांवकऱ्यांनीं अवश्य साधावी. याच्या पुढचा मार्ग ' सभासंचार,'– ह्मणजे पांचदहा मंडळी एकत्र जमून जेथें एकाद्या विषयाची चर्चा चालली असेल त्या ठिकाणीं हजर राहून त्या चर्चेपासून ज्ञान संपादन करणें, हा होय. हाहि मार्ग मागच्या मार्गाप्रमाणेंच सध्यां सर्वांस सुगम झाला आहे. यानंतरचा उपाय ' शास्त्रग्रंथविलोकन, ' ह्मणजे निरनिराळ्या शास्त्रांसंबंधीं पुस्तकांचें वाचन व मनन होय. याच्या सिद्धीसाठीं प्रत्येक खेडयांत एकादें वाचनालय, पुस्तकालय स्थापन करण्याची आवश्यकता आहे. अगदींच लहान खेडयांत हें करतां येणार नाहीं. त्याकरतां पंचक्रोशींतील चारपांच खेडयांतील मोठ्या खेड्यांमध्यें त्याची स्थापना करावी. आणि शेजार-गांवचे लोकांनीं तेथून पुस्तकें नेऊन वाचावीं. आतां राहिलेला पहिला मार्ग ह्मणजे देशाटन. याविषयीं थोडें विस्तारानें लिहिलें पाहिजे.

८ देशाटन म्हणजे सर्व देश फिरून त्यांतील लोकांची, त्यांच्या

निरनिराळ्या चालीरीतींची, त्यांचे उद्योगधंद्यांची, त्यांच्या सामान्य राहणीची माहिती करून घेणें. यासाठीं जो प्रवास करावयाचा तो बैलगाडींतून किंवा आगगाडीतून करण्यापेक्षां पायीं करणें फार फायद्याचें असतें. ह्मणून आगगाडींतुन वगैरे होईल तितकें थोडेंच फिरावें. पायीं फिरण्यानें शरीरास चांगला व्यायाम होऊन काटकपणाही प्राप्त होतो आणि ठिकठिकाणचे सृष्टिसौंदर्याचा देखावा पहाण्यासही सांपडतो. या प्रवासांत एखादा समवयस्क मित्र बरोबर असल्यास फारच उत्तम. त्यामुळें आपल्या आनंदांत व अडचणींत एक भागीदार मिळून पाहिलेल्या गोष्टींविषयीं एकमेकांचे भिन्न विचार ताडून बघण्याची संधी सांपडते आणि एखादा धंदा करण्याचें दोघांचेहि मनांत आल्यास आपल्या किंवा शेजारच्या प्रांतांत त्या धंद्यास योग्य स्थळ पाहून तेथें तो धंदा चालवून त्यांत ' सरदारी ' मिळवून, त्या प्रांतांतील एखाद्या शहरांत प्रतिष्ठित नागरिक होऊन राहणें व आपल्या जन्मदात्या खेडयांत ' ऐपतदारी ' संपादून तेथें वसंत ऋतूंत आपल्या मुलाबाळांसह महिनाभर रहाणें, व तेथील गरीब लोकांच्या सुखासमाधानाच्या व सोईंच्या साधनांकडे लक्ष्य देणें हें ध्येय साधतां येतें. हें ध्येय कोणत्या दैवशाली, उत्साही, उद्योगी व धाडसी तरुणास पसंत पडणार नाहीं बरें? पण हें ध्येय साधण्यास सर्व तरुणांनीं ' काटक व काटकसरी ' बनलें पाहिजे.

९ जगांतील कोणत्याही देशाकडे पाहिलें तरी शिलेदारी किंवा ऐपतदारी या वर्गापेक्षां हा ' कामदारी ' वर्गच फार मोठा असतो, असें आढळून येईल. यांत राजापासून रंकापर्यंत सर्व लोकांचा समावेश होतो. आजच्या सुधारलेल्या काळांत सर्व देशांत खालचे आणि वरचे असे जनतेचे वर्ग पाडलेले दिसतात, पण या वर्गांचा खरा पाया ह्मटला तर कामदारी, ऐपतदारी व शिलेदारी या आम-

च्या तीन रीच होत, असें कोणाही विचारी मनुष्यास दिसून येईल. पहिली व दुसरी री च फार मोठी व महत्वाची आहे. त्याच दोघी राष्ट्राच्या शरीर व आत्मा होत. तिसरी री त्या दोघींचें ऐक्य राखणारी शक्ति होय, असें ह्मटलें तरी चालेल.

( १ ) ऑथर ( Author ) ह्मणजे ग्रंथकार, ( २ ) एडिटर ( Editor ) ह्मणजे वर्तमानपत्रकार, ( ३ ) बॅरिस्टर ह्मणजे पक्षसमर्थनकार ( Barrister ), ( ४ ) डाक्टर ह्मणजे आरोग्यकार ( Doctor ), ( ५ ) मास्टर ( Master ) किंवा प्रोफेसर (Professor) ह्मणजे अध्यापनकार, (६) एंजिनियर (Engineer) ह्मणजे शिल्पकार किंवा यंत्रकार, आणि ( ७ ) काँट्राक्टर ह्मणजे (Contractor) मक्तेदार व तसाच मॅन्युफ्याक्चरर (Manufacturer) ह्मणजे कारखानदार या आठ रान्तांस ( ह्मणजे र अक्षर आहे अंतीं ज्यांच्या त्यांस ) जनतेतील समाजमंदिराचे भव्यस्तंभ किंवा खांब ह्मणण्यास हरकत नाहीं. हे खांब स्वराज्याच्या भक्कम पायावर उभे केलेले असतात व ह्मणून या आठ वर्गांतील लोकांस वरचे वर्ग ह्मणतात. यांसच डोक्याचें ह्मणजे बुद्धीचें किंवा अक्कलेचें काम करणारे कामदार असें ह्मणण्याचा परिपाठ पडला आहे. आणि खालच्या वर्गांतील लोकांस हाताचे म्हणजे घडकाम, ओबडधोबड काम करणारे कामगार किंवा कामकरी असें गणण्याचा रिवाज रूढ झाला आहे. पण त्यामुळें वरचे वर्गांतील मनुष्यांनीं आपणांस श्रेष्ठ समजून खालचे वर्गांतील माणसांस हिणविण्याचें किंवा अवमानण्याचें अथवा खालचे वर्गांतील इसमांनीं वरचे वर्गांतील व्यक्तींचा मत्सर किंवा हेवादावा करण्याचें कांहींच कारण नाहीं. कां कीं, " काम म्हणजे कर्म न करितां कोणालाही क्षणभर देखील रहातां येत नाहीं. याकरितां हे अर्जुना, तूं ईश्वरप्रीत्यर्थ कर्म कर, आणि कर्मफलाविषयीं असक्त होऊन रहा," असें भग-

वान श्रीकृष्ण परमात्म्यानें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. या कर्माच्या योगानें तुह्मी आपली अभिवृद्धि करून घ्या. हें तुमच्या इष्ट कामना सिद्धीस नेईल. वरच्या ह्मणजे बुद्धीचें काम करणाऱ्या लोकांनीं, व खालच्या म्हणजे घडकाम करणाऱ्या लोकांनीं, परस्परांस साह्य करून, अवघ्यांनीं सुपंथ धरून स्वराज्याचा भक्कम पाया भरावा, व त्यावर सुंदर अष्टपलु मंदिर उभारावें अशी सर्व देशबांधवांस कळकळीची विनंति आहे.

---

## ३ ऐपतदारी.

आमृत्योः श्रियमन्विच्छेन्नैनां मन्येत दुर्लभाम् ।

१० देशांतील एकंदर लोकांविषयीं विचार करूं लागलें असतां पहिल्यानेंच हीं गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, बहुतेक लोकांचा जन्म खेडेगांवीं झालेला असतो. शहरांतील धनाढ्य नागरिकांचे तिसऱ्या किंवा चौथ्या पिढीचे मागील पुरुष तरुणपणीं खेड्यापाड्यांतून येऊन शहरांत राहून आपल्या उद्योगाच्या, बुद्धीच्या, कर्तबगारीच्या बळावर श्रीमान नागरिक बनून त्यांपैकीं कोणी तेथेंच आपलें कायमचें ठाणें घालतात, व कोणी शहर म्हणजे आपलें व्यापारधंद्याचें कांहीं दिवस चैनीनें राहण्याचें ठिकाण करून आपल्या मूळच्या जन्मभूमींत टुमदार घरदार, बागबगीचा वगैरे करून तेथे **ऐपतदारीनें** रहातात. म्हणूनच मागील प्रकरणांत ऐपतदारीस स्वराज्याचा पाया किंवा आधार असें म्हटलें आहे. आतां हा पाया दृढ म्हणजे भक्कम कसा रचावा याचा विचार या प्रकरणांत करण्याचें योजिलें आहे.

११ **कामदारी, ऐपतदारी व शिलेदारी** यांपैकीं पहिल्या दोहींस राष्ट्राचें शरीर व आत्मा; व त्या दोहींचें ऐक्य राख-

णाऱ्या तिसरीस राष्ट्राची शक्ति असें मागील प्रकरणांत म्हटलें आहे. चैतन्यस्वरूप आत्मा हें शक्तीचें मूळ असून तेथून ती सर्व शरीरांतील अवयवांस आपापलीं कामें यथास्थित बजावण्यास लावते हें सर्वांचे अनुभवास येतें. आत्माच शरीरांत मन, बुद्धि, अहंकार व चित्त या चोकडीच्या रूपानें नांदत असतो. शरीर जडस्वरूप व आत्मा चित्स्वरूप आहे. दोघांच्याही पोषणास भिन्न प्रकारचे अन्नाची जरूर असून त्या अन्नाचे मगदुराप्रमाणें त्यांचीं कामें श्रेष्ठ म्हणजे वरच्या दर्जाचीं व कनिष्ठ म्हणजे खालच्या दर्जाचीं ठरतात. आणि कामाच्या दर्ज्यावरून कामदारांचे ( १ ) डोक्यानें काम करणारे, व ( २ ) हातानें काम करणारे असे दोन वर्ग पडतात.

डोक्यानें काम करणाऱ्या श्रेष्ठ वर्गांतून निघणारे कामदार मागें सांगितलेल्या आठ " रकारान्तां-" त समाविष्ट होतात आणि त्यांच्याहून अवशिष्ट राहिलेले इतर कामदार जगांतील इतर धंद्यांचें काम करीत असतात. पुढील विवेचनांत सोईसाठीं आपण आठ रकारान्तांतील काम करणारांस ' कामदार ' व इतरांस ' कामगार ' असें समजूं.

१२ कामदार व कामगार या दोघांचीही जन्मभूमि देशांतील खेडींपाडींच होत. आणि त्यांतच देशांतील **ऐपतदारीचा** मोठा भाग नांदत असतो. या ऐपतदारींतून **ल.वा.मा.**चें प्राथमिक मानसिक शिक्षण घेऊन व त्याबरोबरच भाकरी मिळवून देणाऱ्या एकाद्या तरी **री** चें शारीरिक शिक्षण घेऊन जे तरुण, होतकरू, काटक व काटकसरी लोक शहरांत जाऊन आपल्या आवडीप्रमाणें व लायकीप्रमाणें आठ रकारांत समाविष्ट होऊन भाग्यास चढतात, त्यांस **नागरिक** म्हणजे नगरवासी अथवा शहरांत रहाणारे, व खेड्या-पाड्यांत रहाणाऱ्यांस **जानपद** या सदरांत गण-

ण्याची सुधारलेल्या देशांत वहिवाट दिसते.

१३ **जानपद व नागरिक** या **सहोदर** बंधूंचा जन्म **ऐपतदारी भूमाते**च्या उदरीं होऊन ते बाळपणांतून तारुण्यांत प्रविष्ट झाल्यावर ज्या मानानें एकमेकांच्या खांद्यास खांदा लावून—

विवेकें क्रिया आपुली पालटावी ।
अती आदरें शुद्ध क्रीया धरावी ॥

या रामदासवचनाप्रमाणें शहरांत अथवा खेडेगांवांत असतां आप-आपलीं कर्तव्यें बजावीत रहातील, त्या मानानें त्यांच्या या माय-देशास स्वराज्याचा लाभ लौकर अगर उशिरां होणार आहे. स्व-राज्यांत—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चातुर्वर्ण्याची वस्ती जेथें सुखानें नांदावयाची—त्या स्वराज्याच्या पहिल्या घटकाची म्हणजे ग्रामाची—गांवाची—व्याख्या अशी आहे कीं—

तथा शूद्रजनप्राया सुसमृद्धकृषीवला
क्षेत्रोपभोगभूमध्ये वसतिर्ग्रामसंज्ञिता ॥ १ ॥

या लक्षणाप्रमाणें जेथें जमीन कसणारे—खेडणारे—मातबर शेत-करी, व त्यांच्या धंद्यास मदत करणारे **कारू-नारू** म्हणजे बलु-तेदार-अलुतेदार वगैरे पुष्कळसे मजूर रहातात, त्या स्थळास खेडें—गांवढें—किंवा **गांव** म्हणावयाचें. अशा प्रत्येक खेड्याचे मागें **मौजे** हा शब्द लावण्याचा रिवाज आहे. खेड्यांतील लोक-संख्या वाढून तेथील कसबी म्हणजे कुशल मजूर, हरहुन्नर व व्यापार करून चार पैसे वाळगून राहूं अशी उमेद धरणारे धाडशी लोक जेथें राहतात, त्या मोठ्या वस्तीच्या ठिकाणास **कसबा** म्हणतात. मोठ्या व्यापाराच्या वस्तीस **पेठ** अशी संज्ञा आहे. आणि पेठांच्या समुदायास शहर, पूर, नगर, आबाद असे शब्द जोडून फुलशहर, नागपूर विजापूर, अहमदनगर, अहमदाबाद अशीं मोठमोठ्या शहरांचीं व राजधान्यांचीं नांवें पडलीं आहेत.

बहुतेक **कसब्यांचीं** व **पेठांचीं** गांवें हलींच्या **तालुक्यांचीं** व **जिल्ह्यांचीं** ठाणीं झालीं आहेत. आणि बाकीचीं शहरें हलींच्या इलाख्यांच्या किंवा लहानमोठ्या संस्थानांच्या राजधान्या बनलीं आहेत. याप्रमाणें खेड्यांपासून राजधान्यांपर्यंतच्या **स्वराज्याच्या भक्कम पाया**ची व त्यावरील **सुंदर अष्टपैलु मंदिरा**ची सुस्थिति कायम राहण्यास **जानपदांनीं** व **नागरिकांनीं** काय काय केलें पाहिजे तें आपल्या निरक्षर बांधवांस कळवावयाचें हाच हें लहानसें पुस्तक लिहिण्याचा उद्देश आहे.

१४ जानपदांतून नागरिकांचा वर्ग निर्माण होतो; आणि खेडीं व शहरें, राजधान्या या स्वराज्याच्या एकाहून एक वरिष्ठ **तंत्रांत** अथवा **दुव्यांत** दळणवळण (म्हणजे **येरजार**) चालत राहिलें म्हणजे या **अष्टपैलु मंदिरा**स सुशोभित राहण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं, हें मागील थोडीं पानें लक्षपूर्वक वाचणाऱ्यांचे ध्यानीं आलेंच असेल.

प्रत्येक जानपदानें व नागरिकानें आपल्या कल्याणासाठीं त्रैमूर्ति दत्तात्रेयाची एकनिष्ठेनें उपासना केली पाहिजे. त्या तीन मूर्ति खालच्या श्लोकांत वर्णिल्या आहेत—

रुचते मनुजां **स्वतंत्रता**, दुसरी ते **समता**हि सन्मता;
तिसरी गमते **सुबंधुता**, त्रितयें या जगतांत धन्यता. १७
**स्वतंत्रता** ऐहिक पारमार्थिका, हितासि दे साधुनि तेचि साधका
दुजी स्वरीती **समता** मता जनीं, न वर्णभेदा कधि उद्भवी मनीं.

**बंधुता**हि रुचिरा[1]चि होय ती,
आश्वपाक[2] सम[3] जी गणी यती[4];

---

१ सुंदर. २ चांडालपासून सर्व. ३ सारख्या पायरीचे, म्हणजे ब्राह्मण श्रेष्ठ आणि इतर कनिष्ठ असें नव्हे. ४ संन्याशापर्यंत.

स्तुत्य वंद्य गुण घेउनी मनीं
हेंचि लक्षण तिचें भलें जनीं. १९

वरील पद्यांतील स्वतंत्रता ( Liberty ), समता (Equality) आणि बंधुता ( Fraternity ) यांचें शिक्षण मिळवितांनाच प्रत्येक मुलास लहानपणापासून आणखी एका तिकलीची जरूर असते. ती तिकल अशी—

विचार आधीं ठरून मनांत, उच्चार त्याचा घडतो जनांत;
आचार तो मागुनि ये कृतींत, रान्तत्रया स्थैर्य तयींच येत. ८
आचाररूपें प्रकटावयास, विचार, लागे करणें प्रयास;
जनांस तो संमत व्हावयास, उच्चार आवश्यक होय त्यास. ९

आईबापांच्या मनांत विचार उद्भवून, त्यांचा उच्चार त्यांचे तोंडून वारंवार झालेला ऐकणें, व त्यांचा आचार वडिलांचे नेहमींचे वागणुकींत डोळ्यांसमोर असणें या गोष्टींचा मुलांचें शील बनण्यास फार चांगला उपयोग होतो. ही गोष्ट पुढील श्लोकांत सांगितली आहे.

मातापित्यांच्या बघुनी कृतींतें, कन्या तसे पुत्रहि वागती; तें–
प्रसिद्ध लोकांत असेच सारें, त्यांचें तसें वर्तन इष्ट बा रे. १०

वरील पद्यांत कथन केल्याप्रमाणें पुढील पिढीचें शील बनण्यास ऐपतदारींतील सध्यांच्या पिढीनें काय केलें पाहिजे त्याचें दिग्दर्शन पुढील कवितांत केलें आहे—

जरी पाहिजे या जगीं थोर मान,
तरी माजलें जें जनीं मद्यपान,
खणा त्यास आधीं करोनी प्रयत्ना,
जरी वांछितां त्या स्वराज्याख्य रत्ना ११

गुरूंची आज्ञा पाळण्याची संवय मुलांस लहानपणापासून लाविली पाहिजे. व तशी संवय असल्यानें श्रीरामचंद्राचें आचरण

कसें होतें त्याचें असें वर्णन आहे—

आज्ञा गुरूची परिपाळण्यांत
राज्यावरी हाणुनि एक लात
श्रीराम गेला सहजीं वनास;
सांगा मुलां हें, करुनी प्रयास. २५

राष्ट्रांत या सद्गुरु विप्र साचे, ध्यानीं धरा बोल सदा तयांचे;
वागा तसे; साधिल तें हितातें; कल्याण देईल सुतां-सुतांतें. १२
झाले बहू जे गुरु या जगांत, त्यांचें न होईल कधीं गणात;
आपापल्या बा, गुरुंना भजावें, परी सहिष्णुत्वें पैरीं धरावें. १४

हीं आमुची रीत जुनी मनांत
बा, वागवावी, फिरतां जनांत;
कल्याण तेणेंचि जगांत होय.
चित्तांत दे या वचनास सोय. १५

आह्मीं हिंदूंनीं पूर्वी आमचें **स्वराज्य** असतांना आपल्या देशांत ज्यांना रहाण्यास आश्रय दिला त्या सर्व जातींच्या लोकांनीं नवीन प्राप्त होणाऱ्या **स्वराज्यांत** खुशाल रहावें. आह्मीं वरच्या १४ व्या श्लोकांतील **तत्व** पाळलें म्हणजे सर्वांसच सुख लागणार आहे, हें सांगणें नकोच.

या जातींचें परिगणन खालच्या श्लोकांत आहे—

**इस्रायलां** त्यापरि **पारशांना,**
तैसे **फिरंग्यांसहि इंग्लिशांना,**
त्या **आरबां,** त्यापरि **मोंगलांतें**
राहावयाला दिधलें स्थलांतें. १७

वरील आमच्या सहिष्णुतेचें उदाहरण घेऊन **इस्रायल** आ-

---

१ मुलांस. २ मुलींस. ३ सहनशीलता. ४ परधर्मांचे गुरुंविषयीं व लोकांविषयीं.

पल्या **थालमुद**, **पारशी** आपल्या **झेंदावेस्ता**, **फिरंगी**, **इंग्लिश** व अलीकडे नवीन आलेले **युरोपियन** व **अमेरिकन**, आपल्या **बायबला**प्रमाणें आपला धर्म पाळून आमच्याशीं सलो-ख्यानें वागल्यास सर्वांचे भरभराटीस केवढें साहाय्य होईल बरें ?

**ऐपतदारीं**तील **गांवगाडा** सुरेख चालण्यास ज्या कोणत्या गोष्टींची अवश्यकता आहे त्या येणेंप्रमाणें—

चालायाला **गांवगाडा** सुरेख, तेथें आधीं पाहिजे काय देख,
**शाळा** आणी शाहणे पांच **पंच**, यांचा तेथें पाहिजे एक संच २६

याशिवाय **गांवाची** स्वच्छता, आरोग्य, लोकांतील किरकोळ तंट्याचे निकाल करण्यासाठीं स्वराज्यास भूषण असलेली आमची

जी **गांवपंचायतिची** जुनी रिती,
स्वराज्यपायाच गमे मनास ती.
करा पुनर्जीवन त्या सुरीतिचें,
कीं बालकां शिक्षण तेंवि नीतिचें. २७

याप्रमाणें **गांवपंचायती**ची आणि शाळेचीच स्थापना करून केवळ भागणार नाहीं. तर—

सुविद्याप्रसारा झटावें द्विजांनीं, करावें तयां साह्यही अंत्यजांनीं;
प्रकारें अशा वागतां एकमेकीं, **स्वराज्यार्थ** ती कां न होईल एकी

ही **एकी** झाली ह्मणजे **स्पृश्यास्पृश्य**विचारास खो मिळा-लाच. त्यासाठीं निराळी खटपट करावयास नको. जाती राहातील, पण **जातिभेदाचें बंड** मोडेल. कारण—

जनीं निर्मिलें जातिभेदा विधीनें,
जनां प्राप्त तो होय त्यांच्या क्रियेनें;
म्हणोनी जनीं जातिभेदें रहावें;
परी **जातिच्या मत्सरातें** त्यजावें. ३९

मिळे जन्मकाळीं जया जाति जी, ती
धरीती शहाणे, कधीं न त्यजीती;
कधीं होउं देती तिची ना फजीती,
प्रयत्नें तिला उन्नतीतेंचि नेती. ४०

पुढारी खरे, जातिचे, दूरदर्शी,
म्हणोनी तयां नेमुनी कार्यदर्शी,
**स्वराज्या** मिळायास या सर्व देशीं
झटावें **जनॅ**-टाकुनां आळसाशीं. ४१

हीं सर्व कार्यें घडून येण्यास **ऐपतदारीं**तील शाळेंत प्राथमिक **ले.वा मा.** चें शिक्षण कोणत्या भाषेंत दिलें पाहिजे याचा उलगडा पुढच्या श्लोकांत आहे—

**स्वराज्यस्थिती** यावयातें अवश्य, अशा शिक्षणातें नको पारवश्य
म्हणोनीच तें देशभाषेंत यावें, **जना**, एवढें कार्य आधीं करावें ३४

हें शिक्षण देतांनाच मुलांच्या मनांत एक तत्व चांगलें बिंबविलें पाहिजे. तें असें कीं—

जुन्या पूर्वजांच्या रिती आदराव्या,
बऱ्या वाटल्या **अन्यदेशी**हि घ्याव्या;
स्वदेशीय वस्तू सदा वापराव्या,
मनानेंहि सेवूं नये ज्या पराव्या. ३०
शिकावें कराया पराव्या स्वदेशी
कला जाणुनी घेउनी ज्या विदेशी;
**स्वराज्या**मधें ज्या करायास देशी
नको खर्चही फारसा, हें पहाशीं. ३१

आणखीही एक **मोठें तत्व** मुलांचे हृदयांत ठसवून, त्याचें आचरण त्यांजकडून करविलें पाहिजे, तें असें—

कुटुंबीय जे त्यांस संतोषवाया,
झिजे ज्या दिशीं आपुली अल्प काया,
असे धन्य तो दीस, ऐसें शिकाया
मुलां लाविता, तें न जाईल वाया. ७२

येथवर **ऐपतदारींतील** व्यवस्थेचें दिग्दर्शन केलें. यापेक्षां सविस्तर माहितीसाठीं व **नागरिकांस** कोणतें शिक्षण द्यावें यासाठीं नवीन प्रस्थापित झालेल्या **टिळक**विद्यापीठाचे, **टिळक**-पाठशाळेचे व **टिळक**-प्राथमिक शाळांचे नियम पहावे.

ऐपतदारींतील व्यवस्थेचें दिग्दर्शन करितांना जानपदांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय संपल्यावर त्यांनीं काय करावें याची दिशा अशी सुचविली आहे—

खेड्यांतील खरेंच सुंदर हवापाणी, मुलें, सेवुनी,
तारुण्यांत, शिकावया बहुकला, राहोत ती जाउनी-
आबादीं, नगरीं, पुरीं, तांशीच बा, त्या जुन्नरीं, खिन्नरीं,
व्हाया थोर, उदार पौर म्हणुनी प्रख्यात तेथें बरीं. ५६

याप्रमाणें मुलें पुढें " थोर उदार पौर " म्हणजे उत्तम प्रकारचीं नागरिक बनल्यावर—

पौरांमध्यें, सकल जानपदांमधें कीं,
स्पर्धा दिसेल बरवी अवघ्याच लोकीं–
तेव्हांच सत्प्रगति होउनि, उन्नतीतें
पावेल देश, लथडोनि अधोगतीतें. ५८

## ५ राजसत्ता कीं लोकसत्ता?

—— —:०:— ——

महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति । –मनु.

जन्माबरोबरचि जे मिळतात हक्क
साधावया निजहिता मनुजास चक्क,
दृष्टीपुढें सतत ठेवुनि ते, झटावें
देशार्थ; तत्व जनमानसिं हें पटावें. ४

१५ महात्मा **गांधीं**च्या नेतृत्वाखालीं सध्यां आपल्या देशांत सर्वत्र अनत्याचारी असहकारी चळवळीची लाट प्रजाजनांच्या मनोमहाब्धीवर उठली असून मोठाल्या राजधान्यांपासून तों **पेपतदारी**पर्यंत ह्मणजे खेड्यापाड्यांपर्यंत ती जाऊन थडकली आहे, हें वर्तमानपत्रें वाचणारांस विदित आहे. ही अनत्याचारी असहकारिता (Nonviolent Non-co-operation) कोणाची, कोणाशीं व कशाकरितां चालली आहे, व हिचें मूळ कोणत्या गोष्टींत आहे या प्रश्नाचा ऊहापोह प्रस्तुत प्रकरणांत करावयाचा आहे.

१६ आह्मां प्रजेची ही अनत्याचारी असहकारिता आमच्या सध्यांच्या राजकर्त्यांशीं राजसत्तेकरितां सुरू झाली आहे. आमच्या देशांतील राजसत्ता हल्लींच्या राज्यकर्त्यांनीं कोणकोणत्या साधनांनीं कसकशी संपादन केली तें सर्व इतिहासज्ञांस माहितच आहे. भूतलावर राजसत्तेचें रोपटें आलें कोठून व त्याचा विस्तृत व प्रचंड जोमदार वृक्ष बनला कसा, ही हकीकत तपासूं लागलें ह्मणजे आपल्या प्राचीन वाङ्मयांत खालील मजकूर आढळतो–

" आरंभीं लोकांमध्यें कांहीं व्यवस्था नव्हती. प्रबळानें दुर्बळावर जोरजबरी करावी; त्याची मालमत्ता, जमीनजुमला, बायकोमुलें हरण करावीं, असा अनर्थ होऊं लागला. तेव्हां चार शहाण्यांनीं मिळून मनूस विनंति केली कीं, तूं आमचा **शास्ता** ह्मणजे

**राजा** हो, व सर्वांस यथान्याय वागावयास लाव. मनु तें पतक-रीना. शेवटीं कित्येक अटींवर त्यांचें म्हणणें त्यानें मान्य केलें."

या हकीगतीवरून पहातां निदान आपल्या देशांत तरी **राज-सत्तेचा** उगम लोकांमधून झाला हें स्पष्ट दिसतें. पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही देशाच्या किंवा राष्ट्राच्या इतिहासांत अशी गोष्ट आढळण्यांत येत नाहीं, हें लक्षांत धरिलें पाहिजे.

वरील स्तबकांत ( कलम १५ ) सांगितल्याप्रमाणें 'लोकमत' म्हणजे लोकांनीं पसंत केलेल्या पुरुषाच्या हातीं सत्ता असेपर्यंत देशांतील प्रजा सहजींच धनधान्यसंपन्न होऊन सुखांत नांदत असली पाहिजे आणि सत्ताधारी पुरुषाच्या पिढींतील पुढील वार-साचें शिक्षण त्यांच्या देखरेखीखालींच होऊन पुढील पिढीचे पुढें मागच्या पिढीचें आचरण कित्याप्रमाणें असल्यामुळें देशांतील 'सत्ता' एका कुळांतच 'सुप्रतिष्ठित' झाली असावी. व हेंच राजसत्तेचें मूळ असावें. पण जगतांत एक परिस्थिति सारखीच चालणें अशक्य असल्यामुळें मधून मधून प्राचीन '**वेन**' राजासारखे दुरात्मे उत्पन्न होऊन जनतेच्या हातून त्यांस शासन झाल्याच्या कथाही पुराणांत आढळतात. या हिंदुस्थानांत, भारत वर्षांत द्वापारयुगाच्या शेवटापर्यंत बहुतेक अशींच लहानमोठीं 'स्वराज्यें' चहूंकडे पसरलेलीं असावींत. सर्व देशांत नाना-जातींच्या व धर्मांच्या लोकांचें 'साम्राज्य' अस्तित्वांत असल्याचा दाखला आढळांत येत नाहीं. रामायण व भारत कालानंतर बरींच वर्षे अशी स्थिति राहून अलीकडील सुमारें तीन हजार वर्षांपासून देशस्थितींत अनेक फेरफार होऊन, गेल्या ५०० वर्षांचे इतिहासांत तर 'मोंगली साम्राज्य' 'मराठी साम्राज्य' असे शब्द रूढ होऊं लागून सध्यां तर आपण ब्रिटिश साम्राज्यांत अंत-र्भूत असून, सध्यांची पूर्ण स्वराज्याची मागणी करण्यापूर्वी आपण

ब्रिटिशसाम्राज्यांतर्गत स्वराज्य मागत होतों.

पण प्रस्तुत कालीं आमची भूक एवढ्यानें भागत नसून, जगाचे इतिहासांत अदृष्टपूर्व अशी चीज म्हणजे देशांत प्रतिष्ठित असलेल्या साम्राज्यसत्तेशीं अनत्याचारी असहकारिता दाखवून तिच्या जोरावर नवीन पूर्ण स्वराज्य मिळविण्याची आह्मी हांव धरीत आहों. हें स्वराज्य मिळून तें देशांत कायम राहण्यास प्रजाजनांतील प्रत्येक मनुष्यास प्राथमिक शिक्षणाबरोबरच त्याच्या जन्मसिद्ध हक्कांचें ज्ञान मिळालें पाहिजे. आणि देशरक्षणासाठीं अवश्य लागणाऱ्या शिलेदारीचें शिक्षणही त्यास मिळून तो उत्तम नागरिक बनला पाहिजे व या उत्तम नागरिकांतून लोकवृत म्हणजे लोकांनीं पसंत केलेला देशाध्यक्ष, लोकाध्यक्ष, किंवा राष्ट्रसूत्रधार या पदावर आरूढ झालेल्या पुरुषाचे हातून राष्ट्राची अंतर्गत व बहिर्गत व्यवस्था चालू होईल त्या दिवशीं ‘राजसत्ता कीं लोकसत्ता?’ हा प्रश्न सुखासमाधानानें सुटला असें मानतां येईल.

---

## ६ अष्टमूर्ति कीं त्रिमूर्ति ?

भूरंभास्यनलोनिलोंबरमहर्नाथो हिमांशुः पुमान्
इत्याभाति चराचरात्मकमिदं यस्यैव मूर्त्यष्टकम् ।
नान्यत्किंचन विद्यते विमृशतां यस्मात्परस्माद्विभोः
तस्मै **श्रीगुरुमूर्तये** नम इदं श्रीदक्षिणामूर्तये ॥ १ ॥

१७ देशांतील लोकसमाजांत आसुरी स्वभावाच्या थोड्याशा प्रबळ माणसांपासून पुण्यशील सात्विक सज्जनांच्या बहुजनसंख्येला नानाप्रकारचे उपद्रव होऊं लागल्यामुळें त्या संख्येंतील दूरदर्शी व शहाण्या मंडळीच्या सल्लामसलतीनें संघटनात्मक राजसत्तेची उत्पत्ति कशी झाली हें मागील प्रकरणांत कथन केलें. येन

**कंस, जरासंध** यांच्यासारख्या पौराणिक कालांतील दुष्ट भूपाळांचें व त्यानंतरच्या नवनंदादिक ऐतिहासिक युगांतील अधिपतींचें शासन करण्यांत सुघटित समाजांतील अलौकिक बुद्धिमत्तेच्या पुरुषांसही केवढा विलक्षण स्वार्थत्याग करावा लागतो, हें द्वारकाधीश श्रीकृष्णाच्या, आर्यचाणक्याच्या व अलीकडील श्रीशिवाजीमहाराजांच्या चारित्रावरून वाचकांच्या ध्यानांत येईल.

१८ देशांतील **श्रेष्ठसत्ताधारी** व्यक्ति कितीही सामर्थ्यवान, बुद्धिमान् आणि न्यायनिष्ठ व पापभीरु असली तरी तिला लोकशासनाचें काम सुव्यवस्थित रीतीनें पार पाडण्यास सल्लागार नियामक मंडळाचें ( कायदे करणाऱ्यांचें ), कार्यकारी मंडळाचें ( प्रधानमंडळाचें ) व परकीय शत्रूपासून देशाचें रक्षण करण्यासाठीं भूचर, जलचर, आणि यापुढील काळांत व्योमचर सैनिकांचेंहि साहाय्य अवश्यच लागणार आहे. तेव्हां या सर्व साहाय्यकांची योजना जेवढ्या विस्तृत व खोल पायावर झाली असेल त्याप्रमाणें स्वराज्याचा पाया दृढ होऊन त्यावरील भव्य इमारत शोभिवंत दिसेल हें उघड आहे.

१९ हा पाया म्हणजे आरंभीं सांगितलेल्या तीन **री** होत. त्यांतील पहिली म्हणजे सर्व देशांतील उद्योगधंदा करून पोट भरणारी **प्रजा** अथवा कामकरी लोक. हीच **कामदारी**. दुसरी **पेपतदारी** म्हणजे शेतकरी वर्गापासून तों थेट मोठमोठ्या जमीनदार, इनामदार, जहागिरदार व संस्थानिकांचा वर्ग होय; आणि तिसरी देशसंरक्षणासाठीं लढण्यास तयार रहाणारी **शिलेदारी** म्हणजे सैनिक वर्ग होय. या तीनही वर्गांतील लोक जितके इमानी, उद्योगी, पराक्रमी, निश्चयी आणि धार्मिक असतील, त्या मानानें स्वराज्याचें आयुष्य दीर्घ असणार हें सांगावयास नकोच. या तीन वर्गांच्या शरीरबळावर, द्रव्यबळावर व बुद्धिबळावरच अष्टमूर्ति

वा त्रिमूर्ति हा प्रश्न सुटावयाचा आहे.

त्रिमूर्ति ह्मणजे **विचार, उच्चार,** आणि **आचार** हे तीन **रान्त** होत. यांचें अधिष्ठान अर्थात् अष्टमूर्ति, ह्मणजे तिसऱ्या **कामदारी** प्रकरणाचे शेवटीं उल्लेख केलेला आठ रान्तांचा वर्ग होय. या वर्गासच **नागरिक** ह्मटलें आहे. व याच्यां शिक्षणाची दिशा टिळक–विद्यापीठ व टिळक–पाठशाळेचे नियम पाहून ठर-वावी, असें **पेपतदारी** प्रकरणाचे शेवटीं सुचविलें आहेच.

**नागरिक** वर्गांतील लोकांना मिळेल तितकें **वरिष्ठ** प्रतीचें शिक्षण संपादन करून त्यास शोभतील असेच आपले **विचार, उच्चार** व **आचार** ठेवून, त्यांयोगें **ज्ञानपदांस** त्यांच्या व देशाच्या हिताचे मार्ग दाखविले पाहिजेत. ह्मणजे दोघांतही **ऐक्य** राहून तिसरा ह्मणजे **शिलेदारी**चा वर्ग निर्माण होईल. या वर्गांतील लोकांच्या आंगीं मुख्यतः **शरीरबळ** पाहिजे. त्याचे जोडीस बुद्धिबळ मिळेल तितकें चांगलें. **कामदार** व **पेपतदार** लोकांनीं बाळपणापासून पंचवीस तीस वर्षांचें वय होईपर्यंत व्यावहारिक शिक्षणाबराबरच **शारीर** शिक्षण घेऊन मुलांची **शरीरकाठी बळकट** व **कणखर** बनविण्याची काळजी ठेविली, ह्मणजे **कार्यक्षम शिलेदारी** वर्ग देशांत भरपूर मिळ-ण्यास केव्हांही अडचण पडावयाची नाहीं.

२१ वर सांगितल्याप्रमाणें देशांतील तीनही **री** सुशिक्षित असल्या ह्मणजे **स्वराज्याचा** पाया **दृढ** होऊन त्यावर **भव्य अष्टपैलु मंदिर** उभारण्याची तयारी झाली. **स्वराज्यमंदि-राचा** पाया **विस्तृत** व **खोल** पाहिजे. याचा अर्थ असा कीं, देशांत **कुधारक** ( शेतकऱ्यापांसून संस्थानिकांचा वर्ग ) पुष्कळ पाहिजेत, व त्यांच्याच थोडें खालोखाल **वसुधारक** नागरिक लोक पाहिजेत. अर्थात् देशांत **कामदारीचा** व **पेपतदारीचा**

मोठा भरणा पाहिजे. या भरण्यांतील लोकांस चांगलें शारीरिक व व्यावहारिक कलांचें शिक्षण प्राप्त झालेलें असलें म्हणजे देशरक्षणास पाहिजे तेवढा तिसरा **शिलेदारी**चा वर्ग मिळूं शकेल.

२२ या **शिलेदारी**ला लष्करी, आरमारी आणि नभश्चारी शिक्षण कसें द्यावयाचें त्याचा विचार स्वराज्यप्रतिष्ठापना झाल्यावर करतां येईल. तरी येथें येवढें सुचवून ठेविलें पाहिजे कीं, सामान्य पायदळाची कवाईत आणि डेक्कन जिमखान्यामार्फत जे मर्दानी खेळ होतात त्यांतील प्रावीण्य संपादन करण्याची सध्यांच्या तरुण पिढीनें हौस बाळगिल्यास त्यांस लष्करांतील मानाच्या जागा मिळण्याची संधी लौकरच येईल.

२३ **जगत्स्रष्ट्या व जगन्नियंत्या शंकराचें स्वरूप अष्टमूर्ति व त्रिमूर्ति** असें दोन प्रकारचें आहे. अष्टमूर्ति रूपांपैकीं पहिलीं सात म्हणजे पृथ्वी, आप वगैरे हीं जडस्वरूप असून आठवें **पुरुष हें चित्स्वरूप** आहे. पृथ्वी, आप, इत्यादि पंचमहाभूतांच्या स्वरूपानेंच कोणत्याही देशांतील जडसंपत्ति व्यक्त झालेली असते, व तेथील प्रजा म्हणजे राष्ट्र किंवा लोक या स्वरूपांत तेथील **चित्संपत्ति** अभिव्यक्त झालेली असते. चराचर जगताच्या उद्धाराचें म्हणजे **जगदुद्धाराचें** कार्य, किंवा त्या जगतांतील विशिष्ट भागाच्या म्हणजे देशाच्या उद्धाराचें म्हणजे **देशोद्धाराचें** कार्य, देशांतील **चित्संपत्तीनें** म्हणजेच **राष्ट्रानें** एकमतानें निवडून पसंत केलेल्या **लोकाध्यक्षाच्या** म्हणजे **राष्ट्रसूत्रधाराच्या** हातून **त्रिमूर्तीच्या** म्हणजे देशांतील तीन " री " च्या साह्यानें व्हावयाचें असतें.

जगदुद्धाराच्या या कार्यक्रमाप्रमाणें आपल्या या **आर्यावर्ताच्या**—या **पुण्यभूमीच्या**—या **हिंदुस्थानाच्या**—या **भारतवर्षाच्या**—या आजच्या **हिंदुस्थानाच्या** उद्धारासाठीं हिंदु-

स्थानच्या राष्ट्रीय सभेनें निवडलेल्या **राष्ट्राध्यक्षाच्या** हातून हें **देशोद्धाराचें** कार्य लौकर सिद्धीस गेलें ह्मणजे " **अष्टमूर्ति का त्रिमूर्ति** ? " हा **प्रश्न** सुटला.

---

## ७ चातुर्वर्ण्य कीं एकवर्ण्य ?

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।
तस्य कर्तारमपि मां विद्धयकर्तारमव्ययम् ॥

—गीता, अध्याय ४.

२४ सर्व माणसें देवाचीं लेंकरें आहेत, असें ख्रिस्ती धर्मशास्त्रांत म्हटलें आहे. आणि तें कोणत्याही धर्मशास्त्राचे दृष्टीनें पाहतां खोटें नाहीं. पण आमचें आर्यांचें धर्मशास्त्र काय सांगतें तें आपणांस पाहिलें पाहिजे. श्रुति, स्मृति, पुराणें आणि सदाचार मिळून आपलें धर्मशास्त्र बनलें आहे. त्यास धरूनच वरील भगवान् श्रीकृष्णाची उक्ति आहे.

भगवान् ह्मणतात—" गुणकर्मांच्या विभागानुसार मीं चार वर्ण—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र—निर्माण केलें. ( मायेच्या व्यवहारानें ) या कर्मांचा जरी मी कर्ता आहें, तरी ( परमार्थतः ) मी अकर्ता व असंसारी आहें असें समज. " याचा असाही ध्वन्यर्थ होऊं शकेल कीं, चातुर्वर्ण्याचा जरी मी ( मायेच्या व्यवहारानें ) कर्ता असलों तरी ( परमार्थतः ) मी याचा अकर्ताच आहें. तर मग या चार वर्णांचा कर्ता कोण ? याचा चिकित्सक बुद्धीनें शोध करूं गेलें तर असें दिसून येईल कीं, त्या त्या वर्णांच्या गुणांवरून आणि कर्मांवरून हे वर्ण व्यवहारांत निसर्गानेंच उत्पन्न झाले आहेत. ते असेः—प्रथम, रानांतील वृक्षांचीं फळें व कंदमुळें आणि पशुपक्ष्यांची शिकार करून तेवढ्यावर उदरभरण कर-

ण्याचें कठीण पडूं लागल्यावर मनुष्यें जेव्हां सुधारणेच्या मार्गास लागलीं असतील, तेव्हां त्यांच्यांतील कित्येक शेतकरी बनून धान्य पिकवूं लागले असतील. कित्येक त्या धान्याची दुसऱ्या जिनसांबद्दल अदलाबदल व नेआण करूं लागले असतील; कित्येक त्या काळीं उपयोगांत असलेलीं हत्यारें-पात्यारें घेऊन वरील दोन धंद्यांत गुंतलेल्या लोकांचें, रानटी स्थितींत राहून लूटमार करणाऱ्या टोळ्यांपासून रक्षण करण्याचे कामीं, पुढें सरसावले असतील; व त्याच वेळीं हीं तीनही कामें करणाऱ्यांतूनच जे अमळ जास्त बुद्धिमान् असतील ते हीं कामें इतरांच्या हातून जास्त कौशल्यानें व व्यवस्थित रितीनें कशीं होतील या गोष्टीचा विचार करण्यास व त्या विचारानुसार त्या कामांचें त्यांस शिक्षण देण्यास तयार झाले असतील. या शेवटच्या वर्गांतील लोक ब्राह्मण, त्यांच्या मागील क्षत्रिय, त्यांच्या मागील वैश्य, व या तिघांच्याही मागचे ते शूद्र अशा क्रमानें हे वर्ग उत्पन्न झाले असावे. अर्थात् आरंभीं सर्वांचा एकच वर्ण असल्यामुळें त्यांच्यांत स्पृश्यास्पृश्यतेचें बंड नसेलच. मग ही वर्णव्यवस्था त्यांच्यांत कायम होत जाऊन त्यांच्या रहाण्याचा प्रदेश त्यांस पुरेनासा होऊं लागतांच ते भोंवतालच्या मुलुखांवर स्वाऱ्या करूं लागले असावेत व तेथील लोकांस जिंकून त्यांच्यापैकीं आपल्या चार वर्णांत सामील होण्याची ज्यांची लायकी असेल त्यांस त्या त्या वर्णांत दाखल करून घेऊं लागले असतील. व या जितांपैकीं जे अमळ अभिमानी व या व्यवस्थेस नाखुष असतील ते दूरच्या दूर डोंगराळ व अरण्यमय प्रदेशांत हटत गेले असतील. आज तारखेस जे गोंड, भिल्ल, कोळी, वारली, तोडा वगैरे जातीचे लोक आहेत ते या प्रकारचे लोक होत. याप्रमाणें उत्पन्न झालेले चारच वर्ण आज सर्व देशभर दिसत आहेत. फक्त दक्षिणेस मद्रासेकडे एक 'पंचम' वर्ण म्हणून गाजत असून

तिकडील आजचे आपणांस 'ब्राह्मणेतर' म्हणविणारेही 'पंचमांस' अस्पृश्य मानीत आहेत.

२५ कोणत्याही धर्माच्या दृष्टीनें पाहतां माणसें जर देवाचीं लेंकरें आहेत, तर मग त्या सर्वांचा वर्ण एकच; मग रंगानें तीं पांढरीं, काळीं, पिंवळीं, तांबडीं कसलींही असोत. पण आजकाल पहावें तों युरोपांतील पांढऱ्या माणसांनीं उत्तर अमेरिकेंतील तांबड्या इंडियनांचा पाडलेला फडशा, आमच्या लोकांतील काळे अदमींची जालियन बागेंतील शिकार किंवा कत्तल, आणि एशिया खंडांतील त्यांस जळींस्थळीं डोळ्यांपुढें दिसत असलेलें यलोफिअर नष्ट करण्यासाठीं पिंवळ्या माणसांच्या देशाचे लचके तोडून घेण्या-बद्दलच्या त्यांच्या अनेक खटपटी व कारस्थानें, हेंच जिकडे तिकडे दृष्टीस पडतें. या भरतभूमींत मात्र नांदत असलेलें चातु-र्वर्ण्य नष्ट करण्यासाठीं एकवर्णी गोऱ्या लोकांचे केवढे खटाटोप चालले आहेत, व त्यांच्या मोहपाशांत गुरफटून जाऊन ब्राह्म-णेतरांचा कोल्हापुरी तमाशा नाचविण्यांत कोणी महाराजा कसा गुंग झाला होता हें आज सर्वांच्या नजरेस येत आहेच. असो.

२६ चातुर्वर्ण्य ईश्वरनिर्मित असो वा श्रमविभागाच्या तत्वा-वर गुणकर्मविभागशः उद्भूत झालेलें असो, त्यानें आमच्या देशावर पुष्कळ उपकार केले आहेत, इतकेंच नव्हे तर एकंदर जगावरही त्याचे परंपरया उपकारच झाले आहेत असें वाटतें. कसें तें पहा: मनुष्यजातीचा एकच वर्ण मानून सररहा रोटीबेटीव्यवहार कर-णाऱ्या पांढऱ्या माणसांनीं भरलेल्या युरोपखंडाची आज काय स्थिति आहे बरें? राजांच्या राक्षसी महत्वाकांक्षेनें महायुद्धाचा वणवा पेटून त्यांतच भांडवलवाले आणि मजूरदार यांच्यामधील तंट्यांनीं, संपांनीं व बाल्शेविझमसारख्या पंथांनीं आणि बहुतेक देशांत बोकाळत चाललेल्या नास्तिक्यबुद्धीनें किती लोकसंख्येचा

संहार झाला आहे ? चातुर्वर्ण्यामुळें लोकसमूहांतील सर्व वर्गांतील माणसांस अनेक प्रकारचे धंदे उदरनिर्वाहासाठीं नेमून दिलेले आहेत. आश्रमव्यवस्थेमुळें आचारपालनांत अहोरात्रांतील काळानें "वेळापत्रक" ठरून गेलेलें आहे. धर्मविचार व व्यावहारिक शास्त्रांचा विचार करून त्यांचें शिक्षण इतर वर्णांस देण्याचें पवित्र कार्य श्रेष्ठ वर्णाकडे सोंपविल्यामुळें आजतागायत येथील प्रजा आनंदांत नांदत आहेत. वर्णगुरूंनीं तर अध्यात्मज्ञानाचें ( ईश्वरविषयक ज्ञानाचें ) एवढें भांडार भरून ठेविलें आहे कीं, ख्रिस्ती शकाच्या सुधारलेल्या विसाव्या शतकांत नव्या आणि जुन्या जगांतील मोठाले विचारी विद्वान्‌ही तें पाहून तोंडांत बोटें घालीत आहेत व त्याचा आपले देशांत प्रसार करण्यासाठीं अनेक प्रकारचे यत्न करीत आहेत. चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा जगावर हा परंपरया उपकारच नव्हे काय ?

२७ एकवर्णव्यवस्था ज्यांच्यांत रूढ झालेली आहे तीं पाश्चात्य राष्ट्रें त्या गोष्टीबद्दल मोठी बढाई मिरवीत असतात; पण त्यांच्या सामाजिक स्थितीचें सूक्ष्मदृष्टीनें निरीक्षण करणारांस काय आढळून येतें बरें ? संपत्तीच्या मदानें फुगलेला भांडवलवाल्यांचा वर्ग, आपल्या घराण्याचे ऐतिहासिक महत्वाबद्दल व खानदानीबद्दल अभिमान बाळगणारा बडे लोकांचा वर्ग, आपल्या उद्योगानें, विद्याबळानें व व्यापारधंद्यांतील कौशल्यानें संपन्न होऊन खाऊन-पिऊन सुखी असणारा मधल्या स्थितींतील लोकांचा मोठा वर्ग, आणि दारिद्र्यानें पीडिलेला अर्धपोटीं राहणारा शहरांतील गटारां-भोंवतीं व अनीतीमध्यें आणि मद्यपानगृहांच्या आसपास थंडी-वाऱ्यानें कुडकुडणारा समाजाच्या तळचा वर्ग यांमध्यें आमच्या चातुर्वर्ण्यांत दिसून येणाऱ्या वैषम्यापेक्षांही भयंकर वैषम्य ज्यांस दृग्गोचर झालें नसेल त्या आमच्या विलायतेची यात्रा करून

आलेल्या राजा-महाराजांची आणि सुधारकाग्रणींची तीव्र बुद्धि आणि तीक्ष्ण नजर कांहीं " और चीज " असली पाहिजे असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.

२८ हिंदुस्थान हा देश शेतकीच्या धंद्यास लायक; येथील प्रजेनें गहू, तांदूळ इत्यादि सर्व प्रकारचीं धान्यें, कापूस, ताग, आंबाडी, लोकर, रेशीम, वगैरे वस्त्रें विणण्यास लागणारे जिन्नस, आणि इतर सर्व प्रकारचा कच्चा माल मुबलक पिकवावा; आणि तो सहा हजार मैलांवर सातां समुद्रापलीकडे इंग्रज व्यापाऱ्यांनीं व भांडवल-वाल्यांनीं आपल्या देशांत नेऊन त्याचा पक्का माल बनवून तो येथें परत आणून येथील लोकांस वाटेल तितका फायदा घेऊन विकावा, असा क्रम आज दोन अडीच शतकें चालला आहे. त्यामुळें आमचे लोक भिकेस लागून अन्नास महाग झाले आहेत. त्यांच्यांत त्राण म्हणून बिलकूल राहिलें नाहीं. परकीय राजसत्तेच्या पाव्यावरवंट्याखालून निघण्याशिवाय आतां आम्हांस दुसरा मार्ग राहिला नाहीं. तेव्हां आम्हीं स्वराज्याची मागणी करूं नये असें आमच्या वरच्या सत्ताधाऱ्यांशिवाय दुसरा कोणता विचारी पुरुष म्हणेल बरें?

२९ आमच्या राज्यकर्त्यांच्या जातीपैकीं मोठमोठे मुत्सद्दी व मेकालेसारखे उदार बुद्धीचे ग्रंथकार आम्हांस थापा देत आले आहेत कीं, बाबांनो तुम्ही अज्ञान, साळेभाळे, आपसांत तंटेबखेडे करून एकमेकांच्या उरावर बसणारे लोक; तेव्हां तुम्हांस सज्ञान करून तुम्हांस सुधारण्यासाठीं तुमच्यावर राज्य करण्यास आम्हां इंग्रजांस देवानें येथें पाठविलें आहे. राज्यकर्त्यांचें हें म्हणणें कबूल करून आम्हीं आतां त्यांस असें बजावून सांगत आहों कीं, देवाच्या दयेनें आजपर्यंत तुमच्या अंमलाखालीं राहून, तुमच्या सर्व सुधा-रणांचा लाभ घेऊन, आम्ही आपल्या देशाचा राज्यकारभार चाल-

विण्यास समर्थ झालों आहों. तुमच्याशीं भांडण करून, मारामारी करून, युद्ध करून, रक्तपात करण्याची आम्ही इच्छा करीत नाहीं. त्या इच्छेप्रमाणेंच महात्मा गांधी आणि त्यांच्या सल्लामसलतीनें वागणारे आमच्यांतले देशभक्त पुढारी अनत्याचारी असहकारी बनून तुमच्या तुरुंगांतील हालअपेष्टा भोगण्यास पुढें सरसावले आहेत. पाश्चात्य संस्कृतीच्या धोरणानुसार निदान सध्यांपुरता तरी "चातुर्वर्ण्य कीं एकवर्ग ?" हा प्रश्न आज सुटल्यासारखा दिसत आहे.

---

## ८ त्रिवर्ग, चतुर्वर्ग कीं एकवर्ग ?

चरितं देवदेवस्य महादेवस्य पावनम् ।
अपारं परमोदारं चतुर्वर्गस्य साधनम् ॥
—शिवरक्षा ( याज्ञवल्क्य. )

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ॥ ४१
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ ४२
—भगवद्गीता, अ १०

३० स्वराज्याचा पाया कोणच्या तत्त्वावर उभारावयाचा आणि त्यावरचें मंदिर कोणत्या प्रकारें बांधावयाचें याचा नकाशा मागील सात प्रकरणांत रेखाटला आहे. आतां त्या नकाशाप्रमाणें उभारलेल्या मंदिरावर कळस कोणत्या नमुन्याचा बसवावयाचा तें दाखवून मंदिराची घरभरणी ह्मणजे गृहप्रवेशाचें शुभ कार्य करण्याचें काम आमच्या देशबांधवांवर सोंपवून हा भाग व हें लहानसें पुस्तकही पुरें करावयाचें आहे.

३१ विषयप्रवेश करतांना 'धर्मार्थकाममोक्षाणाम्' हें प्रतीक

घातलें आहे. या समारोपाच्या भागाचे शिरोभागीं ‘ चरितं देव-देवस्य ’ इत्यादि वचनें उद्धृत केलीं आहेत. त्यांची यथामति एकवाक्यता दाखविली म्हणजे हें कीर्तन किंवा निरूपण आटोपलें म्हणावयाचें. मागील सातव्या प्रकरणाचे आरंभीं ‘ सर्व माणसें देवाचीं लेंकरें आहेत ’ हें ख्रिस्तीशास्त्रांतील वचन दाखल केलें आहे. आपल्या सर्व लेंकरांनीं आपापल्या देशांत गुण्यागोविंदानें-सुखासमाधानानें राहून आपल्या देशांत जें पिकत असेल व आपल्या कलाकौशल्यानें आपणांस जें निर्माण करतां येत असेल त्याचा एकमेकांशीं व्यापारदृष्टीनें विनिमय करून सर्वांनीं मोक्षाच म्हणजे स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घ्यावा हा ईश्वरी संकेत दिसतो. त्यास अनुसरूनच आमच्या प्राच्य ह्मणजे पूर्वेकडील आर्यांच्या संस्कृतीचा विकास झालेला आहे. आजपर्यंतचा आमचा इतिहास पाहिल्यास दिसून येईल कीं, ज्या ज्या अनार्य जातींशीं आमचा संबंध आला, त्यांस आमची सुधारणा देऊन, व त्यांच्यांत जें ग्राह्य असेल तें आपण घेऊन आम्ही त्यांचा उद्धार केला, आणि त्यांचा आपणांत समावेश करून घेतला. असें करतांना आम्हीं त्यांच्या देशांतून त्यांचें उच्चाटन केलें नाहीं किंवा त्यांचा नायनाट केला नाहीं. जावा बेटांतल्यासारख्या प्राचीन हिंदी वसाहती, किंवा व्यापारासाठीं जेथें आमचा प्रवेश गेल्या तीनशें वर्षांत झाल्याचें दिसत आहे असे आफ्रिकेच्या पूर्व भागांतील देश यांची स्थिति पाहिली असतां या गोष्टीचें प्रत्यंतर दिसून येतें. आतां पाश्चात्य संस्कृतीचा प्रसार जेथें ह्मणून झाला आहे, किंवा आमच्या देशांतल्यासारखा जेथें आजही होत चालला आहे त्या प्रदेशांची काय हालहवाल आहे ती पाहूं.

३२ आमच्या राज्यकर्त्यांची जन्मभूमि जो इंग्लंडदेश त्याचाच इतिहास सांगतो कीं, तेथें पूर्वी “ हेप्टार्की ” ह्मणजे सात लहान

लहान संस्थानें होतीं. तीं आलफ्रेड दि ग्रेट या इंग्रज राजानें आपल्या राज्यांत सामील केलीं. पुढच्या इंग्रज राजांनीं शेजारच्या स्काटलंड व वेल्स देशचे लोकांस जिंकण्याचे अनेक प्रयत्न करून शेवटीं त्यांस आपल्या राज्यांत दाखल करून ग्रेटब्रिटनचें संयुक्त राज्य स्थापन केलें. शेजारच्या आयर्लंड बेटांत तर आज सातशें वर्षे इंग्रजांचा अम्मल बसला असूनही तेथें यांचा धुमाकूळ आजतागायत चाललाच आहे, आणि तेथील मूळच्या आयरिश लोकांचे वंशज आजही आमच्याप्रमाणेंच इंग्रजांस बजावून स्वराज्याची मागणी करीत आहेत. नुकतेंच संपलें म्हणून जाहीर झालेल्या महायुद्धाचें रणांगण जें जर्मनसाम्राज्य, त्याचाही इतिहास अशाच तऱ्हेचा आहे. अठरावे शतकाच्या आरंभापर्यंत जर्मनी हें एक लहानसें संस्थान होतें. फ्रेडरिक दि ग्रेटच्या पूर्वींच्या राजांनीं, खुद्द फ्रेडरिकनें, व त्याच्या पुढील राजांनीं भोंवतालच्या छोटया संस्थानांशीं लढाया करून त्यांस जिंकून सुमारें पस्तीस-चाळीस संस्थानांचें एकीकरण घडवून जर्मन साम्राज्याची स्थापना केली. इंग्रजांनीं उत्तर अमेरिकेंत प्रवेश करून तेथील मूळच्या तांबडया इंडियनांची कशी दाट लाविली, आणि स्पानिश व पोर्च्युगीज लोकांनीं मेक्सिको, ब्राझिल वगैरे देशांत शिरून आपल्या वसाहती स्थापिल्यापासून तेथील मूळच्या रहिवाशांची वासलात कशी लागली, हें इतिहासज्ञांस विदितच आहे. गेल्या दहा बारा वर्षांखालीं आफ्रिकेंतील ट्रान्सव्हालमधल्या सोन्याच्या व हिऱ्यांच्या खाणींच्या लोभानें त्या प्रदेशावर डाक्टर जामेसन व ऱ्होडस या इंग्रज मारवाडयांनीं स्वारी करून इंग्रजांस बोर लोकांशीं युद्ध करण्यास कसें भाग पाडिलें व त्या लढाईप्रीत्यर्थ हिंदुस्थानच्या खजिन्यास केवढा चाट बसला, आणि शेवटीं बोर लोकांस व्हाल नदीचे पलीकडे स्वदेशत्याग करून कसें जावें लागलें, हें वर्तमान-

पत्रें वाचणारांचे ध्यानांत असेलच. स्वातंत्र्यासाठीं इंग्रजांशीं लढून नवीन प्रजासत्ताक राज्याची स्थापना करणाऱ्या अमेरिकन लोकांनीं स्पेनच्या ताब्यांतून फिलिपाइन बेटें घेऊन तेथें स्वराज्याची स्थापना केल्याचें जाहीर केलें, पण आजतारखेसही फिलिपाईनमधील लोकांस पूर्ण स्वातंत्र्य मिळालेलें नाहीं. नुकत्याच संपलेल्या युद्धाचे शेवटीं झुलुलॅन्ड, बसुटोलँड वगैरे आफ्रिकेंतील देश इंग्रजांचे तावडींत सांपडले आहेत, त्यांची काय दशा होईल तें लौकरच दिसून येईल. पण गेल्या दोनअडीचशें वर्षांत इंग्रजांनें आमच्याशीं जें वर्तन होत आलें आहे, त्यावरून वरील देशांची भवितव्यता काय आहे याचें अनुमान कोणासही सहज होईल.

आमच्या पूर्वजांनीं व त्यांचे राजांनीं अश्वमेधाचे प्रसंगीं आपल्या भोंवतालच्या राज्यांवर स्वाऱ्या करून त्यांस पादाक्रान्त केल्याचें भारतादि पुराणेतिहासांत दिसतें. पण त्याच ठिकाणीं असेंही नमूद करून ठेविलेलें आढळतें कीं, जित भूपतींनीं जेत्या राजाचें अधिराज्य कबूल केलें म्हणजे त्या जित राजांचीं राज्यें त्यांजकडे चालू रहात रहात; आणि अशी स्थिति असल्यामुळेंच त्या काळच्या स्वतंत्र राज्यांचे अवशेष म्हणून राहिलेलीं सुमारें सातशें संस्थानें आज हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेखालीं मांडलिक म्हणून दाखल झालीं आहेत. या हकीकतीवरून आर्य म्हणजे पौर्वात्य आणि अनार्य म्हणजे पाश्चिमात्य संस्कृतींतून कोणती संस्कृति श्रेष्ठ तें वाचकांनीं आपले मनांत ठरवावें.

वरील दोन्ही संस्कृतींचा नीट विचार करून विषयप्रवेशाच्या पहिल्याच स्तबकांत विचारलेल्या "आपण अजागलस्तनांच्या-गलथान माणसांच्या वर्गांत सामिल होणार काय?" या प्रश्नाचें उत्तर वाचकांनीं द्यावें. त्यांस त्या वर्गांत दाखल व्हावयाचें नसेल तर त्यांनीं "अनत्याचारी असहकारी" बनून, विरोधी सत्ताधारी

मंडळानें दुराग्रहास वश होऊन तसा प्रसंगच आणल्यास त्याच्याशीं दोन हात करून स्वराज्यप्राप्तीसाठीं आपल्या देहाचे बळी देण्यास सिद्ध झालें पाहिजे. तरच या हिंदमातेचे ते खरे पुत्र ठरतील.

३३ येथें प्रसंगच आल्यास युद्धही केलें पाहिजे असा अर्थ गर्भित होतो. तेव्हां जगाच्या व्यवहारांत युद्ध करणें केव्हां वाजवी असतें व केव्हां अन्यायाचें असतें याविषयीं चार शब्द येथें बोलल्यास त्यायोगें विषयाचीही पूर्तता होणार आहे. ह्मणून त्या मुद्द्याचा येथें थोडा विस्तार करूं. युद्ध हा क्षत्रियांचा धर्म आहे. आणि क्षत्रिय म्हणजे चातुर्वर्ण्यपद्धतींतील एक वर्ग. परंतु जेथें ती पद्धति मान्य नाहीं, तेथें तो सर्व जातीचाच धर्म ह्मणण्यास हरकत नाहीं. अर्थात युद्ध ही धर्माची बाब ठरली. व ह्मणूनच–

धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते ॥
अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥

असें भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनास ह्मटलें आहे. सर्व धर्मांत स्वसंरक्षण, स्वधर्मरक्षण, आणि स्वदेशरक्षण हा श्रेष्ठ धर्म होय. या तीन गोष्टीकरतांच युद्ध करणें श्रेयस्कर व न्यायाचें होय. या तीन गोष्टींकरतांच शिवाजीमहाराजांनीं युद्ध केलें. म्हणून त्यांची कीर्ति जगाच्या इतिहासांत अजरामर होऊन राहिली. याशिवाय दुसरीही एक युद्धाची बाब सर्व देशांत व सर्व धर्मांत न्यायाची व प्रशंसेची मानिली आहे. ती स्त्रियांच्या पातिव्रत्यरक्षणार्थ आणि अनाथांच्या व दीनांच्या संरक्षणार्थ केलेलें युद्ध होय. या दोन हेतूंनीं युद्ध करणाऱ्या वीरांची प्रशंसा सर्व काळांत होऊन त्यांची कीर्ति काव्यरूपानें वा कादंबरीरूपानें सर्व भाषांतून महाकवींनीं व ग्रंथकारांनीं गाइलेली आढळते. रामायण, इलियड, डॉनक्विक्झोट हीं

याचींच उदाहरणें ह्मणण्यास हरकत नाहीं. युरोपांतील ख्रिस्ती राजांनीं एशियामायनरमध्यें चालविलेलीं 'क्रूसेड्स' नावाचीं युद्धें, आणि अमेरिकेंतील नीग्रो लोकांची गुलामगिरींतून मुक्तता करण्याकरतां केलेलें युद्ध हीं याच दृष्टीनें न्याय्य व धर्म्य होत. बाकी जगाच्या एकंदर इतिहासांतील युद्धें पाहिलीं तर तीं मानी व लोभी राजांच्या कीर्तीच्या हांवेनें व राज्यतृष्णेनें झालीं असल्या-मुळें दूषणीयच ठरल्यावांचून राहणार नाहींत.

३४ 'तेजसो भास्वरशुक्लवर्णः' ह्मणजे तेजाचा—प्रकाशाचा वर्ण चकचकीत पांढरा असतो, असें आमचे नैय्यायिक म्हणतात. आधुनिक शास्त्रीय शोधांकडे पहावें तों त्यांत पांढऱ्या वर्णास ह्म-णजे रंगास मुळीं जागाच नाहीं. कांचेचा एक लोलक सूर्यकिरणांत एका पांढऱ्या कागदावर उभा धरला तर कागदावर सात सुंदर रंग दिसतात. ते ध्यानांत रहाण्याकरतां इंग्रजी भाषेत 'व्हिब्जिओआर' असा एक शब्द सात रंगांच्या नांवांचीं आद्याक्षरें घेऊन योजलेला आहे. तसा मराठी शब्द 'तांनापिंहिनिजांका' असा बनवितां येतो. हे रंग क्रमानें तांबडा, नारिंगी, पिंवळा, हिरवा, निळा, जांभळा व काळा असे होत. यांत पांढऱ्या रंगाला स्थळ नाहीं. तर मग तो आला कोठून? या प्रश्नाचें उत्तर भौतिकशास्त्रज्ञ एक प्रयोग दाखवून देत असतात. त्यांत एक भिंगरी घेऊन तिच्या कांहीं भागांस नियमित प्रमाणांत वरील सातही रंग लाविलेले अ-सतात. ती भिंगरी मोठ्या वेगानें फिरविली ह्मणजे पांढऱ्या रंगाची दिसूं लागते. सातही रंग भिन्न आहेत. तरी कांहीं एका प्रमाणानें ते मिसळले असतां त्यांतून नैय्यायिकांचा 'चकचकीत पांढरा' वर्ण निष्पन्न होतो. त्याप्रमाणेंच आमचें जुनें चातुर्वर्ण्य मद्रासेकडील विद्यमान पंचम वर्ग त्याच्या भरीस घालूनही 'पंचवर्ण्य' संस्था बनविण्यास काय हरकत आहे बरें? मात्र सूर्यकिरणांत जसे

सातही वर्ण नांदतात तसें आमच्या देशांतील लोकसमाजांत पांच-व्हा वर्णांनीं आपापले वर्णाश्रमधर्म पाळून **ऐक्यानें** वागल्यास सूर्यकिरणाप्रमाणें सर्व जगांत आम्ही **तेजस्वी** होऊं यांत कांहीं शंका नाहीं. याच गोष्टीवर लक्ष्य ठेवून व्यवहारांत "अस्पृश्यतेस गचांडी देऊन आपले वर्णाश्रमधर्म पाळून **ऐक्यानें** वागा" असा उपदेश **महात्मा गांधी** लोकांस करीत असावे असें आमच्या बुद्धीस वाटतें. अशा दृष्टीनेंच मागील भागाचे शेवटीं 'चातुर्वर्ण्य कीं एकवर्ण?' हा प्रश्न सुटल्यासारखा **दिसत आहे** असें आम्हीं म्हटलें आहे.

३५ आतां 'त्रिवर्ग, चतुर्वर्ग कीं एकवर्ग' साध्य करावयाचा हें पाहावयाचें आहे. "त्रिवर्गो धर्मकामार्थैः चतुर्वर्गः समोक्षकैः" असें त्रिवर्गाचें व चतुर्वर्गाचें लक्षण अमरकोशांत दिलें आहे. धर्म, काम व अर्थ म्हणजे शास्त्रानें लावून दिलेल्या सदाचाराचें पालन, विषयभोगेच्छेची पूर्ति, आणि धन, यांस त्रिवर्ग अशी संज्ञा आहे; व यांतच मोक्ष म्हणजे संसारांतून मुक्ति ही चवथी गोष्ट मिळविली म्हणजे चतुर्वर्ग झाला. यासच चतुर्विध **पुरुषार्थ** म्हणतात. यांतील शेवटचा पुरुषार्थ जो **मोक्ष** तो साधणें, हें जन्मास आलेल्या माणसाचें **उच्च ध्येय** असावें, असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे. पहिले तीन अर्थ त्या श्रेष्ठ ध्येयाचे साधनभूत होत. **मोक्ष** हा पारलौकिक अर्थ साधण्यास मनुष्याला ऐहिक स्थिति संपन्नतेची पाहिजे व ती लाभण्यास समाजव्यवस्था सुसंघटित असावी लागते. तशा प्रकारची व्यवस्था राहण्यास लोकसमाज अवाढव्य नसावे; बेताचे, सुटसुटित, आटोपशीर व नियंत्रित म्हणजे कायद्यानें बांधलेले असावे. हें नियमन लोकांनीं निवडलेल्या अधिकारी पुरुषांकडून होत असून त्याप्रमाणें लोकांचें वर्तन चाललें आहे कीं नाहीं याची नेहमीं तपासणी श्रेष्ठ अधिकाऱ्यानें

नेमलेल्या कनिष्ठ कामदारांकडून झाली पाहिजे. अशा प्रकारें सुरळीत चालणाऱ्या संस्थेलाच राज्यव्यवस्थातंत्र म्हणावयाचें. ही **राज्यव्यवस्था** ज्या त्या देशांतील लोकांनीं आपल्या इच्छेनुसार करण्याचा त्यांस **जन्मसिद्ध** हक्क असतो. तो हक्क बजावून पृथ्वीवरील सर्व लोकांना आपापले देशांत **स्वतंत्रतेनें, समत्वानें,** व **बंधुभावानें** वागावें असा ईश्वरी संकेत आहे. या संकेताविरुद्ध एखाद्या राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर स्वारी करून, त्यास जिंकून, त्याचें स्वातंत्र्य हिरावून घेणें, व याप्रमाणें **साम्राज्य** स्थापण्याची हाव बाळगून वर आपल्या **विश्वबंधुत्वाचा** डौल मिरवणें हें **महत्पाप** आहे.

प्राचीनकाळापासून हें महत्पाप ज्या राष्ट्रांच्या हातून घडलें त्यांचा नाशच झाला आहे. त्यास्तव, **अफाट साम्राज्यें** फुटून, त्यांतून **स्वयंनिर्णयाचे** तत्त्वावर, ज्या त्या देशांत तेथील लोकांस संमत व इष्ट अशी **स्वराज्य**पद्धतिच अंमलांत यावी, असा ईशसंकल्प दिसतो. त्या संकल्पानुसार, ज्या हीनदीन दशेस पोंचले त्या देशाचा उद्धार व्हावा असा देवाचा हेतु असतो, त्या देशांत **राष्ट्रशक्ति** जन्मास येते. तशा **शक्तीच्या** जन्माची खूण म्हणजे **सत्याग्रहाची चळवळ** होय. ही सत्याग्रहाची उग्र तपश्चर्या करणारे **स्वार्थत्यागी** पुरुषच **खरे राष्ट्रभक्त** होत. असल्या राष्ट्रभक्तांनीं एकत्र होऊन गेल्या म्हणजे १९२१ च्या डिसेंबर महिन्यांत **अमदाबादेस** भरलेल्या **राष्ट्रीय सभेंत** जे ठराव ठरले ते अमलांत आणण्याची सद्बुद्धि सर्वांनी धरावी व पुढेंही जे ठराव ठरतील त्यांप्रमाणें वागूं लागावें, अशी सर्व देशबांधवांस आमची विनंति आहे.

३६ पारलौकिक ध्येय **मोक्ष,** त्याचें **साधन** त्रिवर्ग, व तो हस्तगत होण्यास **स्वराज्य** पाहिजे. त्याकरितां सर्व देशबांध-

चांनीं **एका वर्गांत** अथवा **एका वर्णांत** सामिल होऊन परमेश्वराचें तेजोंशभूत जें **विभूतिमत्, श्रीमत्, ऊर्जित्** सत्व सर्व देशभर गेल्या तीन तपांवर फिरत होतें, त्याचें **अपार, परमोदार** व **पावन** चरित रात्रंदिवस डोळ्यापुढें ठेवून त्या **सात्विक वृत्तीं**च्या व्यक्तींची शेवटची इच्छा पूर्ण करण्याकरतां आरंभीं सांगितलेला स्वराज्याचा भक्कम पाया ह्मणजे **ऐपतदारी** ती साध्य करून घेऊन, त्या **पायावर** सर्व हाताचें व डोक्याचें काम करणाऱ्या **रान्तां**च्या अविश्रान्त खटपटीनें **राज्यरूप** संस्था ह्मणजे इमारत किंवा **मंदिर** विराजमान होईल तिच्या रक्षणार्थ सर्वांनीं **शिलेदारी** पतकरून, तिची **सरदारी** ज्यांस जनतेकडून मिळेल, त्यांनीं **स्वतंत्रता, समता** व **बंधुता** या **त्रिमूर्तीं**ची उपासना चालविणें, आणि इतर राष्ट्रांच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याची हांव न धरणे, व त्यांसही आपल्या देशांत त्या त्रिमूर्तींची उपासना चालविण्यास साह्य होणें हाच आपल्या देशांतील **स्वराज्यमंदिरावर कळस** बसविला ह्मणजे **त्रिवर्ग, चतुर्वर्ग** कीं **एकवर्ग** हाही प्रश्न सुटला.

याप्रमाणें **स्वराज्या**चा भक्कम **पाया** व त्यावरील भव्य **अष्टपैलु मंदिर,** याचा **कु-सुरेख** ( वाईटबरा ) **चित्रपट** रचिला आहे. तो **अष्टमूर्ति-शंकरार्पण** असो.

मिति मार्गशीर्ष कृष्ण ४, रविवार, शके १८४४.

---

# ४ शिलेदारी.

( परिशिष्ट )

१ मागील एकविसाव्या स्तबकाचे शेवटीं 'देशांत कामदारीचा व ऐपतदारीचा भरणा मोठा पाहिजे, ह्मणजे त्यामधून देशाच्या रक्षणार्थ पाहिजे तेवढा शिलेदारीचा वर्ग मिळूं शकेल' असें म्हटलें आहे. प्रत्येक राष्ट्रांत हा शिलेदारीचा वर्ग नेहमीचे धंद्यांपैकीं एक धंदा म्हणून पतकरून राष्ट्राचे खर्चानें पोसल्या जाणाऱ्या जितक्या थोड्या लोकांचा असेल तितकाच असणें, व जरूरीचे वेळीं पहिल्या व दुसऱ्या "रीं" तुन ह्मणजे कामदारींतून व ऐपतदारींतून त्यांत पाहिजे तितकी भरती करतां येण्याची राष्ट्रांत तयारी असणें, ही गोष्ट राष्ट्राच्या सुव्यवस्थेची, शहाणपणाची व धूर्ततेची साक्ष व कसोटीच आहे म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. अशी स्थिति महाराष्ट्रांत शिवाजीमहाराजांचे वेळीं व त्यानंतर कांहीं काळपर्यंत होती असें अनुमान करतां येतें. पुढें पेशवाईचे अखेरीअखेरीस त्या स्थितीचा बिघाड झाला. व हेंच मराठी साम्राज्याचे नाशाचें एक कारण होय, असें म्हटल्यास मोठीशी चूक होईल असें वाटत नाहीं.

२ 'देशांतील प्रत्येक मनुष्यास कांहीं नियमित कालपर्यंत लष्करी शिक्षण मिळालें पाहिजे' असा निर्बंध असल्यामुळें गेल्या महायुद्धांत जर्मनीस सैन्याची तूट केव्हांही बिलकूल भासली नाहीं. पण दुकानदार बनलेल्या आमच्या इंग्रज प्रभूंची या गोष्टींत वेळोवेळीं केवढी तारंबळ उडत होती हें सर्व जगास दिसून आलेंच आहे. साम्राज्याची अब्रू राखण्याकरतां इतके दिवस नाखुष ठेवलेल्या ऐर्लंडची मनधरणी कर, अमेरिकेस 'तुम्ही आमचींच भावंडें' म्हणून गयावया करून युद्धांत भाग घेण्यास

लाव, आजपर्यंत ज्यांच्यांत कांहीं राम नाहीं म्हणून धिक्कारलेल्या शिवाजीमहाराजांचे मराठ्यांसच "मराठा तितका मेळवावा" म्हणून ठोवळ अक्षरांत छापलेले जाहिरनामे रेल्वे-स्टेशनांवर व खेड्यापाड्यांत लावूनसुद्धां साहाय्य करण्यास बोलाव, असे कितीतरी प्रकार इंग्रजांस करावे लागले.

३ साम्राज्यांची अवाढव्य वाढ झाल्यामुळें, व तीं वरकरणी शांततेच्या बाता बोलून आंतून एकमेकांचें मानेस तात लावण्याचे विचारांत नेहमीं गर्क असल्यामुळें, आणि मनुष्यप्राण्यांचे जीवांचे बळी घेणारीं नवीं नवीं शस्त्रास्त्रें भौतिक शास्त्रांचे साह्यानें शोधून काढण्यांत दंग झाल्यानें त्यांस मोठालीं सैन्यें व आरमारें पोसण्यांत आपल्या जमाबंदीपैकीं केवढा मोठा भाग खर्च करावा लागतो, हें दिसूं लागलें आहे. ही सैन्याची व आरमारांची छाटाछाट एकमेकांचे सल्लामसलतीनें व समजुतीनें करण्याकरितांच नुकत्याच भरलेल्या वाशिंग्टन येथील परिषदेची निरर्थकता सर्व जगाचे निदर्शनास आलीच आहे, किंवा लौकरच येईल.

४ हे अनर्थ टाळण्याकरतांच राष्ट्रें लहान लहान होऊन सुखासमाधानांत राहणें व आपापले देशाचे कारभार पाहण्यास समर्थ असणें, आणि याच इष्टतम साध्यासाठीं साम्राज्यें फुटणें अवश्य झालें आहे. या गोष्टीचा आरंभ इजिप्त, आयर्लंड, व हिंदुस्थान या देशांत झाला असून तो नांवारूपास आला म्हणजे वरील सिद्धांताची सत्यता दिसून येईल.

५ हिंदुस्थानास **स्वराज्य** मिळाल्यावर त्यांतील **कामदारी** व **पेशवदारी** आपली **शिलेदारी** ( भूचर, जलचर व खेचर या तिन्ही प्रकारची ) अगदीं थोड्या खर्चानें नेहमीं किती व कशी जय्यत ठेवावी हें ठरवीलच. म्हणून **पेशवदारी** प्रकरणापुढें **शिलेदारी** हें प्रकरण मूळांत मुद्दामच घातलें नाहीं.

## परिशिष्ट २ रें.

**हिंदुस्थानचें** क्षेत्र–लांबी १९०० मैल, × रुंदी १६०० मैल = ३०४०००० चौरसमैल.

लोकसंख्या ३० कोटी, पैकीं ७ कोटी मुसलमान. व ५ क. अस्पृश्य = १२ कोटी. बाकी १८ कोटी.

३० कोटी लोकांपैकीं २५ कोटींवर खेड्यांत राहणारे आहेत. ते वर्षांतुन ४ महिने निरुद्योगी असतात. ते सुत काढण्याचा व कापड विणण्याचा धंदा करतील तर तेवढ्या ४ महिन्यांचे कामानें देखील त्यांस स्वतःपुरतें सवंग कापड मिळून बाकीचें पुष्कळसें इतरांच्या उपयोगास येईल. हे २५ कोटी लोक मोडत चाललेल्या ७॥ लाख ( ७५०००० ) खेड्यांत रहातात.

**ब्रिटिश इलाख्यांत** २५० जिल्हे आहेत. जिल्ह्याचें क्षेत्रफळ सुमारें १६०० ते २५०० चौरस मैल असतें. त्यांत ६ ते १२ तालुके असतात. त्यांत ६०० ते १७०० गांव असतात व लोक १० लाखपर्यंत असतात.

" तालुक्याचें क्षेत्र ६५ ते ४५० चौरसमैल असतें. त्यांत ६५ ते २५० पर्यंत गांव असतात.

५००० वस्तीचें क्षेत्र ह्मणजे गांव, असें मागील खानेसुमारीचे वेळीं धरलें आहे.

**एकंदर वसूल** १२५ कोटींवर आहे.

## रा. ब. गोडबोलेकृत पुस्तकें.

१ **प्रबोधसुधाकर**–श्रीशंकराचार्यकृत मूळ संस्कृताचा मराठींत आर्याबद्ध अनुवाद. ( लो. म. टिळकांचे ६१ वे वाढदिवशीं खास केलेला अहेर ) किं. ०२८६

२ **वेदान्तकेसरी**—श्रीशंकराचार्यकृत शतश्लोकीचा मराठींत आर्याबद्ध अनुवाद. मूळासह. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांचे स्मारकासाठीं. किं. ०४०६.

३ **नवाभिक्षुगीतकाव्य**–स्वराज्यसंपादनाचा निश्चित मार्ग दाखविणारें. किं. ०२.

४ **श्रीसत्यनारायणपूजा व कथा**—हरिदास–पुराणिक यांचेकरितां मराठींत आर्या, श्लोक, दिंडी, साकी व ओवी वृत्तांत मुद्दाम लिहिलेली. किं. ०२०६.

५ **महाराष्ट्रवीरादर्श काव्य**–मराठ्यांचे पराक्रमाचें वीररसवर्धक वर्णन. ( कवि राधारमणकृत ) किं. ०२.

६ **स्वदेशहिताष्टकस्तोत्र**—मूळ संस्कृत. मराठींत समश्लोकी अनुवादासहित ( टिळकस्वराज्यनिधीसाठीं मुद्दाम लिहिलेलें ) किं. ०१.

## बा. भा. जोशीकृत पुस्तकें.

७ **खडीसाखरेचा डबा**—अध्यात्मज्ञानपर १३ गोष्टी व 'योगक्षेमं वहाम्यहम्' ही ध्यानाभ्यासांतील एक अनुभविक गोष्ट. किंमत ०२.

८ **बोवाजींची भेट**—एका पुण्यपुरुषास तत्वबोधाच्या विचारलेल्या पुष्कळ गोष्टींचा मनोरंजक वृत्तांत किं. ०३

व्ही. पी. व टपालखर्च निराळा पडेल.

हीं १ ते ८ पुस्तकें **यशवंत प्रेस, पुणें** येथें मिळतील.

९ **गोमाहिम्नस्तोत्र**—( रा. ब. गोडबोलेकृत ) गोग्रासभिक्षाकचेरींत मुंबई येथें ०१०६ चीं तिकिटें पाठवून मागवावें.